## भारताचा इंग्लंडवर वनडेमध्ये सर्वात मोठा विजय



**अहमदाबाद :** भारताने इंग्लंडला तिसऱ्या वनडे मालिकेत पराभूत करत दणदणीत विजय मिळवला आहे. भारताने प्रथम फलंदाजी करताना ३५६ धावा केल्या होत्या. भेदक गोलंदाजी करत इंग्लंडला २१४ धावांत रोखले आणि १४२ धावांनी भारताने निर्भेळ मालिका विजय नोंदवला. शुबमन गिलचे शतक, विराट कोहलीचे कमबॅक अर्धशतक, श्रेयस अय्यरची वादळी खेळी आणि गोलंदाजांच्या शानदार कामगिरीच्या जोरावर भारताने तिसऱ्या वनडे सामन्यात दणदणीत विजय नोंदवला. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतासाठी हा मालिका विजय खूप महत्त्वाचा ठरला आहे. भारतीय संघ खूप काळानंतर वनडे सामने खेळण्यासाठी उतरला होता, पण भारताच्या सर्वच खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत आयसीसी स्पर्धेसाठी संघांची तयारी चांगली कशी आहे हे दाखवून दिले. चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी हा विजय भारतासाठी महत्त्वाचा आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २०८
www.ramprahar.com

गुरुवार, १३ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


'कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य प्रेरणादायी'/२

कोन फाट्याजवळ एसटी बस उलटून चौघे जखमी/३

जंजिरा किल्ला येथील जेट्टीच्या कामाला सुरुवात/७


# जागतिक गुंतवणुकीसाठी भारताला सर्वाधिक पसंती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जागतिक स्तरावर आमची ओळख अशी आहे की आज भारत वेगाने जागतिक गुंतवणुकीसाठी एक पसंतीचे ठिकाण बनत आहे. व्यावसायिकांनी भारतात येण्याची (गुंतवणूक करण्याची) हीच योग्य वेळ आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्समधील व्यावसायिकांना आवाहन केले. ते १४व्या भारत-फ्रान्स सीईओ फोरमला संबोधित करत होते. ही बैठक म्हणजे भारत आणि फ्रान्समधील सर्वोत्तम व्यावसायिक विचारांचा संगम असल्याचे पंतप्रधान मोदींनी म्हटले.



२०४७ पर्यंत देश विकसित भारत बनण्याच्या दिशेने काम करत आहे. त्यामुळे एक मजबूत व्यवसाय अनुकूल वातावरण आणि धोरणात्मक सातत्या प्रदान केले जात आहे. मी पाहतोय की तुम्ही सर्वजण नवोन्मेष, सहयोग आणि एकात्मिकतेच्या मंत्राने काम करत आहात. तुम्ही केवळ संबंध निर्माण करत नाहीत, तर तुम्ही भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारीदेखील मजबूत करत आहात, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

राष्ट्रपती मॅक्रॉन यांच्यासोबत या शिखर परिषदेत सहभागी होणे माझ्यासाठी खूप आनंदाची बाब आहे. गेल्या दोन वर्षांत ही आमची सहावी बैठक आहे. गेल्या वर्षी,

### पंतप्रधान मोदींची फ्रान्समधील कार्यक्रमात माहिती

राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन हे आपल्या प्रजासत्ताक दिनी प्रमुख पाहुणे होते. या यशस्वी शिखर परिषदेबद्दल मी राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांचे मनापासून अभिनंदन करतो, असे पंतप्रधान म्हणाले. पंतप्रधान मोदींनी या कार्यक्रमात एआय, अवकाश तंत्रज्ञान आणि 'मेक इन इंडिया' कार्यक्रमातील भारताच्या कामगिरीवरही प्रकाश टाकला.

आम्ही २०४७ पर्यंत १०० गिगावॅट अणुऊर्जेच्या उद्दिष्टासह काम करत आहोत. हे क्षेत्र खाजगी क्षेत्रासाठी देखील खुले करण्यात आले आहे, असं पंतप्रधानांनी सांगितले. पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, आज भारत वेगाने जागतिक गुंतवणूकीसाठी एक पसंतीचे ठिकाण बनत आहे. गेल्या दशकात भारतात झालेल्या परिवर्तनकारी बदलांची तुम्हाला जाणीव आहे. आम्ही स्थिर आणि अंदाज लावता येण्याजोग्या धोरणाची परिसंस्था स्थापित केली आहे. सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन या मार्गावर चालत, भारत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे, असा पुनरुच्चार पंतप्रधान मोदी यांनी केला.

जागतिक स्तरावर आमची ओळख अशी आहे की आज भारत वेगाने जागतिक गुंतवणुकीसाठी एक पसंतीचे ठिकाण बनत आहे. आम्ही सेमीकंडक्टर आणि क्वांटम मिशन सुरू केले आहेत आणि संरक्षण क्षेत्रातही 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड' ला प्रोत्साहन देत आहोत, असे पंतप्रधान मोदी यांनी मेळाव्यात सांगितले.

# मित्रपक्षांनीच दगा दिल्याने आमचा पराभव -जयंत पाटील

## 'मविआ'तील घटकपक्षांवर शेकापने फोडले खापर



**अलिबाग : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीत आम्ही इंडिया आघाडीत होतो. डाव्या पक्षांच्या मतांमुळे इंडिया आघाडीचे महाराष्ट्रात १७ खासदार निवडून आले. आम्ही प्रामाणिकपणे काम केले, परंतु विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडीतील घटकपक्षांनी आम्हाला मदत केली नाही. मित्रपक्षांनी दगा दिला, त्यामुळे आमचा पराभव झाला, अशी खंत शेतकरी कामगर पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

शेतकरी कामगार पक्षाचा अलिबाग तालुका कार्यकर्ता संवाद मेळावा अलिबाग येथील पीएनपी नाट्यगृहाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी जयंत पाटील यांनी पराभवाचे खापर इंडिया आघाडीतील घटक पक्षांवर फोडताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या तयारीला लागा, असा सल्ला दिला.

यापूर्वी झालेल्या चुकांमधून आपण धडा घेतला आहे. जो प्रामाणिक आहे त्यालाचा पक्षातील पद दिली जातील. आता सर्वांनी आत्मपरीक्षण करा. आपण काय केले ते पहा आणि कामाला लागा, असा सल्ला जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिला.

# भाजपचा ठाकरे गटासह काँग्रेसला धक्का

## नऊ माजी नगरसेवक करणार पक्षप्रवेश



**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

भाजपनेही ठाकरे आणि काँग्रेसला धक्का दिला आहे. ठाकरेंची शिवसेना आणि काँग्रेस या दोन्ही पक्षाचे कुडाळमधील ९ माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. महाराष्ट्र भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुडाळमधील शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सात, तर काँग्रेसचे दोन असे एकूण नऊ माजी नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा होणार आहे.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा मानहानिकारक पराभव झाला. त्यानंतर आता हळूहळू नेते पक्षाची साथ सोडताना दिसत आहे. कुडाळमध्ये २०१९ मध्ये वैभव नाईक जिंकून आले होते. २०२४ मध्ये मात्र, नीलेश राणे यांनी त्यांचा पराभव केला. त्यामुळे कुडाळमधील समीकरणे बदलली असून, भाजपची ताकद वाढली आहे.

## पुण्यामध्ये जीएसटीचा छापा; १,१९६ कोटींचा घोटाळा उघड

**पुणे : प्रतिनिधी**

जीएसटी गुप्तचर महासंचालनालय (डीजीजीआय)च्या पुणे विभागीय शाखेने १,१९६ कोटी रुपयांचा मोठा जीएसटी घोटाळा उघडकीस आणला आहे.

या प्रकरणाशी संबंधित एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. पुणे, दिल्ली, नोएडा आणि मुझफ्फरनगरमधील विविध ठिकाणी छापे टाकून केलेल्या तपासात बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) व्यवहारांमध्ये सहभागी बोगस कंपन्यांचे एक अत्याधुनिक नेटवर्क आता समोर आले आहे.

अटक केलेली व्यक्ती मुझफ्फरनगरमधील एका खासगी कंपनीची संचालक असून या ऑपरेशनमागील सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

# अवैध पद्धतीने भारतात प्रवेश करणाऱ्यांच्या अडचणी वाढणार

## मोदी सरकार नवीन विधेयक आणणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर अवैध पद्धतीने प्रवेश करणाऱ्यांविरोधात मोठी कारवाई केली. दुसरीकडे, ब्रिटन सरकारनेही अवैध प्रवेश करणाऱ्यांवर कारवाई सुरू केली. आता भारतही या दिशेने एक मोठे पाऊल उचलणार आहे. अवैध पद्धतीने प्रवेश करणाऱ्यांवर कारवाई होणार असल्याची माहिती समोर आली आहे. वैध पासपोर्ट किंवा व्हिसाशिवाय भारतात प्रवेश करणाऱ्यांना कठोर शिक्षा केली जाईल. मोदी सरकार याबाबत



एक नवीन विधेयक आणण्याची तयारी करत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वैध पासपोर्ट किंवा व्हिसाशिवाय भारतात प्रवेश करणाऱ्या कोणत्याही परदेशी नागरिकाला आता जास्तीत जास्त पाच वर्षांचा तुरुंगवास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. जर एखादी व्यक्ती बनावट पासपोर्ट किंवा प्रवास कागदपत्रांसह भारतात प्रवेश करत असेल तर त्याला किमान दोन वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते, तर दंड एक लाख ते १० लाख रुपयांपर्यंत असू शकतो.

ही तरतूद 'इमिग्रेशन अँड फॉरेनर्स बिल, २०२५' चा भाग आहे. या अधिवेशनात लोकसभेत सादर केली जाण्याची शक्यता आहे. या विधेयकाचा उद्देश चार जुने कायदे रद्द करणे आणि एक व्यापक कायदा लागू करणे आहे. या नवीन विधेयकामुळे भारतात अवैध प्रवेश करणाऱ्यांवर आळा बसण्यात मदत होणार आहे.

## निवडक

### काँग्रेसचे सज्जनकुमार शीख दंगल प्रकरणात दोषी

**नवी दिल्ली :** १९८४ मध्ये दिल्लीत झालेल्या शीख दंगलीमध्ये काँग्रेसचा माजी खासदार सज्जनकुमार यांना दोषी ठरविण्यात आले आहे. दिल्लीच्या राऊज अवेन्यू कोर्टाने हा निकाल दिला असून सज्जन कुमार यांच्या शिक्षेवर १८ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे. सरस्वती विहार भागात १ नोव्हेंबर १९८४ ला पिता-पुत्राची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात सज्जन कुमार यांना दोषी ठरविण्यात आले आहे.

### मुंबईत जीबीएसग्रस्त पहिल्या रुग्णाचा मृत्यू

**मुंबई :** येथील नायर रुग्णालयामध्ये एका व्यक्तीचा गुइलेन-बॅरे सिंड्रोमने (जीबीएस) मृत्यू झाला. मुंबईमधील जीबीएसचा हा पहिलाच मृत्यू आहे. ही व्यक्ती २८ जानेवारी रोजी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाली होती. त्या व्यक्तीच्या मेंदूतील पाण्यासह विविध तपासण्या केल्यानंतर त्यांना जीबीएसची लागण झाल्याचे लक्षात आले. प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर नायर रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार करण्यात येत होते.

# राज्यात मच्छिमारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबवणार -मंत्री नितेश राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील गोड्या पाण्यातील आणि सागरी मत्स्योत्पादन वाढीसाठी मच्छिमारांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी घेतला आहे. मंत्रालयात बुधवारी (दि.१२) मत्स्योत्पादन वाढ आणि मच्छिमारांचा कौशल्य विकास, रोजगार आणि या व्यवसायामध्ये नाविन्यता आणण्याच्या दृष्टीने तोडगा काढण्यासाठी बैठक झाली. या बैठकीस मत्स्य व्यवसाय आयुक्त किशोर तावडे, सकाळ ग्रुपचे बॉबी निंबाळकर आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर प्रशिक्षणाचा कार्यक्रम सुरू करण्याचे निर्देश देऊन मंत्री राणे म्हणाले की, किनारपट्टीच्या एका जिल्ह्यातही हा प्रशिक्षण कार्यक्रम प्रायोगित तत्वावर राबवण्यात यावा. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे मत्स्यव्यवसाय आयुक्त कार्यालयाने मूल्यमापन करावे आणि या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मत्स्य उत्पादनामध्ये किती आणि कशी वाढ झाली आहे, मच्छिमारांना



कशा प्रकारे फायदा झाला याचा या मूल्यमापनामध्ये समावेश असावा. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विभागाने त्या त्या जिल्ह्यांच्या नियोजन समितीच्या निधीमधून तरतूद करावी, अशा सूचनाही मंत्री राणे यांनी दिल्या.

मंत्री राणे म्हणाले की, पालघर जिल्ह्यात उभारण्यात येत असलेले वाढवण बंदर हे २०२६ पर्यंत कार्यान्वित होणार आहे. या वाढवण बंदरासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी एक प्रशिक्षण कार्यक्रम तयार करावा आणि तो तातडीने राबवण्याचे नियोजन करण्यात यावे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी मुख्यतः किनारपट्टीच्या जिल्ह्यांना प्राधान्य द्यावे. जेणेकरून किनारपट्टीच्या भागात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. यासाठीही जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यासाठी विभागाने पुढाकार घ्यावा. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अशा प्रकारे जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात येईल. वाढवण बंदरासाठी मोठ्या प्रमाणावर कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. ती राज्यातूनच पूर्ण करण्यासाठी या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उपयोग होणार आहे. याविषयीची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी अशा सूचना मंत्री राणे यांनी दिल्या.

मच्छिमारांसाठी देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शाश्वत मासेमारी व्यवसाय, पर्यावरण स्नेही मच्छिमारी, मच्छिमारांना व्यवसायामध्ये येणाऱ्या अडचणी सोडवणे, त्यांची सुरक्षा, अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांचा समावेश असणार आहे.




**पनवेल : कुंडलिक काटकर यांनी खांदा कॉलनीमध्ये सुरू केलेल्या कार्यालयाचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक अजय बहिरा, एकनाथ गायकवाड तसेच भीमराव पोवार आदी उपस्थित होते. या कार्यालयातून सहकारी संस्था, इन्कम टॅक्स, जीएसटी यांचे मार्गदर्शन होणार आहे.**



# टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राची स्वस्तिका घोष अंतिम फेरीत

## दोन पदके निश्चित



**डेहराडून : वृत्तसंस्था**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिने एकेरीतील उपांत्य फेरीत तर दुहेरीत दिया चितळे हिच्या साथीत अंतिम फेरीत स्थान मिळवित दोन पदके निश्चित केली. या स्पर्धेतील पदार्पणातच महाराष्ट्राची उदयोन्मुख खेळाडू पृथा वर्टीकर तिने उपांत्य फेरीत प्रवेश करीत आपलेही पदक निश्चित केले.

महिलांच्या गटात स्वस्तिका घोष हिने एकेरीतील विजय वाटचाल कायम ठेवताना पश्चिम बंगालच्या पायमंती बैस्या हिचा पराभव केला आणि उपांत्य फेरीतील प्रवेशासह आपले पदक निश्चित केले. उत्कंठापूर्ण लढतीत तिने १०-१२,११-८,११-४, ११-८ असा विजय मिळविला. पहिली गेम गमावल्यानंतर तिने टॉप स्पिन फटके आणि प्लेसिंग असा खेळ करीत उर्वरित तीनही गेम्स घेतल्या. उपउपांत्यपूर्व फेरीत तिने तामिळनाडूच्या एम. नित्याश्री हिचे आव्हान संपुष्टात आणले होते.

दुहेरीमध्ये स्वस्तिका व दिया यांनी पश्चिम बंगालच्या कौशिनी नाथ व प्रिपाती सेन यांचे आव्हान ९-११,७-११,११-५,१२-१०,११-८ असे संपुष्टात आणले. सकाळच्या सत्रात दिया हिचा खांदा दुखावला होता मात्र दुहेरीच्या सामन्यात तिने त्याचा लवलेश न दाखवता स्वस्तिकाच्या साथीत सुरेख खेळ केला. या जोडीने पहिल्या दोन गेम्स गमावल्यानंतर खेळावर नियंत्रण मिळवीत उर्वरित तीनही गेम्स घेतल्या आणि अंतिम फेरीकडे आगेकूच केली. (पान २ वर..)

## राजन साळवी आज 'उबाठा'तून शिवसेनेत

**रत्नागिरी : प्रतिनिधी**



रत्नागिरी जिल्ह्यातील राजापुर लांजा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार राजन साळवी यांनी अखेर शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत उपनेते पदाचा राजीनामा दिला आहे. गुरुवारी दुपारी (दि.१३) साळवी शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे निश्चित झाले आहे.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर नाराज राजन साळवी यांनी शिंदे गटाची कास धरण्याचा निर्णय घेतला आहे. साळवी ते गुरुवारी दुपारी तीन वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

# रायगड जिल्ह्यात २५५ अंगणवाडी सेविका, ५५६ मदतनीसांची होणार भरती

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री १०० दिवसांच्या १०० कलमी कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील एक लाख अंगणवाड्यांमधील सेविका व मदतनीस यांची सुमारे १० हजार रिक्त पदे भरली जाणार आहेत. यामध्ये रायगड जिल्ह्यातील १६ प्रकल्पांमध्ये अंगणवाडी सेविकेची २५५ तर मदतनीसची ५५६ पदे भरतीला एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयाने मान्यता दिली आहे.

या पदांसाठी पात्र उमेदवारांना २१ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करत येणार असून, जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांनी भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व महिला व बालविकास अधिकारी निर्मला कुचिक यांनी केले आहे.



रायगड जिल्ह्यातील अलिबाग प्रकल्पांतर्गत २९ सेविका व ३२ मदतनीस, कर्जत एक प्रकल्पांतर्गत १८ सेविका व ३३ मदतनीस, कर्जत दोन अंतर्गत १३ सेविका व ४० मदतनीस, खालापूर १७ सेविका व ४० मदतनीस, महाड २३ सेविका व ८२ मदतनीस, माणगाव सात सेविका ५७, मदतनीस, तळा सहा सेविका, १७ मदतनीस, म्हसळा सहा सेविका व नऊ मदतनीस, मुरुड तीन सेविका, चार मदतनीस, पनवेल ३२ सेविका व ६१ मदतनीस, पेण ३७ सेविका व ५३ मदतनीस, रोहा २१ सेविका व ५२ मदतनीस, पोलादपूर सहा सेविका व १९ मदतनीस, श्रीवर्धन पाच सेविका व १५ मदतनीस, सुधागड २२ सेविका व २७ मदतनीस आणि उरण १० सेविका व १५ मदतनीस, अशी भरती होणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या १०० कलमी कार्यक्रमाअंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयाने अंगणवाड्यांमधील सेविका व मदतनीस पदे भरतीस मान्यता दिली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील रिक्त पदांची भरती २० मार्चपूर्वी केली जाणार आहे. पात्र लाभार्थ्यांना २१ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहेत.

### अंगणवाडी सेविका पात्रता

- **अर्ज करण्याची अंतिम तारीख: २१ फेब्रुवारी २०२५**
- **वयोमर्यादा: १८ ते ३५ वर्ष(विधवा महिलांसाठी कमाल ४० वर्ष)**
- **शैक्षणिक पात्रता: १२ वी उत्तीर्ण**
- **रहिवासी अट: उमेदवार स्थानिक महसुली गावचा रहिवासी असणे आवश्यक**

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण व सामाजिक कार्य प्रेरणादायी- राज्यपाल

## सातारा येथे केबीपी विद्यापीठाचा प्रथम दीक्षान्त समारंभ उत्साहात

**सातारा, : रामप्रहर वृत्त**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण आणि सामाजिक उन्नतीचे कार्य पिढ्यानं पिढ्यासाठी प्रेरणादायी आहे. रयत शिक्षण संस्था त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचा दाखला देते. त्यांनी ग्रामीण भागातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या वंचित जनतेच्या शिक्षणासाठी आपले जीवन समर्पित केले, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.





कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचा (राज्य सार्वजनिक विद्यापीठ) प्रथम दीक्षान्त समारंभ राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी कॉलेज येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलाधिकारी चंद्रकांत दळवी, कुलगुरु डॉ. ज्ञानदेव मस्के, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक डॉ. हेमंत उमाप, कुलसचिव डॉ. विजय कुंभार आदी उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, शिक्षण आणि जीवन व्यवहारांचा समन्वय असणे आवश्यक आहे. जगाच्या बाजारपेठेत यशस्वी होण्यासाठी जे आवश्यक आहे त्याचा शिक्षणामध्ये अंतर्भाव असणे आवश्यक आहे. हा समन्वय साधण्याच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाचे आहे. याचा विचार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आणि विद्यापीठांमध्ये दिले जाणारे शिक्षण हे जगाच्या बाजारात टिकणारे असले पाहिजे, या दृष्टीने शैक्षणिक धोरण विकसित केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा त्यांच्या सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणासाठीच्या चिकाटीच्या बांधिलकीत आहे. शिक्षणाद्वारे वंचितांना सक्षम बनविणे, त्यांना चांगले जीवन जगण्यास सक्षम करणे यावर त्यांचा विश्वास होता, असे सांगून राज्यपाल म्हणाले, आज आपण एकता, बंधुता, सामाजिक न्याय यावर चर्चा करतो पण याची सुरुवात छत्रपती संभाजी महाराज यांनी केली. जाती, धर्माच्या आधारावर आपण माणसा-माणसात भेद करु शकत नाही.

एखाद्या विशिष्ट जातीत जन्म घेतला म्हणून आपण कोणाला थोर अथवा कनिष्ठ ठरवू शकत नाही. माणसाचे श्रेष्ठत्व हे त्याच्या कतृत्वावरुन ठरते, ही गोष्ट आपण जन्मभर लक्षात ठेवली पाहिजे.

## वडवली फाट्यावर अपघातांची मालिका; प्रशासनाचे दुर्लक्ष



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

वडवली फाटा, श्रीवर्धन तालुक्यातील एक महत्त्वपूर्ण नाका, असुन तेथे अपघातांच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. या फाट्यावर दिशादर्शक फलक आणि गतिरोधक नसल्यामुळे वाहनचालकांना नेहमीच अडचणीचा सामना करावा लागतो, आणि याच कारणामुळे अपघातांची संख्या वाढत आहे.

पुणे-दिघी पोर्ट महामार्ग क्रमांक ७५ च्या कॉंक्रीटीकरणामुळे या मार्गावर अवजड वाहतूक वाढली आहे. या नवीन विकासामुळे वडवली फाटा हा अधिकच जोखमीचा ठरला आहे. वडवली फाटा, जो श्रीवर्धन, दिवेआगर, दिघी पोर्ट आणि जंजिरा किल्ल्यासारख्या प्रमुख पर्यटनस्थळांशी जोडलेला आहे, इथून होणारी वर्दळ फाट्यावरील अपघातांचे मुख्य कारण ठरली आहे.

फाटच्यावर दिशादर्शक फलकांची आणि गतिरोधकांची तीव्र आवश्यकता असल्याचे स्थानिकांसह अनेक वाहनचालकांचे मत आहे. प्रशासनाने यावर त्वरित लक्ष देऊन योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनेक वाहनचालक आणि स्थानिक नागरिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे असमाधान व्यक्त करत आहेत.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी, वडवली फाट्यावर आवश्यक असलेले संरचनात्मक बदल तातडीने राबवले पाहिजेत.

## विकासकामांसाठी पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा वापर बंधनकारक जलबचतीच्या दृष्टीने पालिकेचे पाऊल

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत सिडकोनिर्मित धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाची कामे सुरु झालेली असून इतर खाजगी भूखंडावरील विकास कामेसुद्धा प्रगतीपथावर आहेत. सदर विकास कामांकरिता बहुतांशी पिण्यायोग्य पाण्याचा वापर होतो. सद्यस्थितीत पर्जन्यवृष्टीचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले असून पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू लागली आहे.



त्यामुळे भविष्यात पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये व पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन होण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिकेकडे मोठ्या प्रमाणात पुनर्प्रक्रियायुक्त पाणी उपलब्ध असल्याने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नगररचना विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या विकास कामांच्या बांधकामासाठी यापुढे उपरोक्त त्रिस्तरीय पुनर्प्रकियाकृत पाण्याचा वापर करणे विकासकास बंधनकारक राहणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण सात मलप्रक्रिया केंद्रे अत्याधुनिक एस.बी.आर. तंत्रज्ञानावर सद्यस्थितीत कार्यान्वित आहेत. सर्व सांडपाण्यावर सातही मलप्रक्रिया केंद्रांमध्ये प्रक्रिया करण्यात येते. मलप्रक्रिया केंद्रांमधून बाहेर पडणा-या पाण्याचा अधिक प्रभावी वापर होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या 'अमृत मिशन' अंतर्गत, नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत कोपरखैरणे व ऐरोली येथे टर्शिअरी ट्रिटमेंट प्लान्ट उभारण्यात आले आहेत.

द्विस्तरीय प्रक्रियाकृत पाण्यावर त्रिस्तरीय प्रक्रिया करून, सदरचे पुनर्प्रक्रियायुक्त सांडपाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या टी.टी.सी. औद्योगिक क्षेत्रातील, औद्योगिक संस्थांना पिण्याशिवाय इतर वापरासाठी पुरविण्यात येते.

## आदि 'ती 'महोत्सव; सुधागड-पालीत महिलांसाठी आनंदाचा उत्सव!

### महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरल्या अभिनेत्री मधुराणी गोखले-प्रभुलकर

**पाली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने खासदार सुनिल तटकरे यांच्या संकल्पनेतून तसेच मंत्रीअदितीताई तटकरे आणि माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रायगड राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्षा उमाताई मुंढे आणि सुधागड पाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सहयोगाने त्याचबरोबर सुधागड पाली राष्ट्रवादी महिला सहकार्याने हजारो महिलांच्या उत्स्फूर्त सहभागात तालुक्यात आदि 'ती' महोत्सव भव्यदिव्य स्वरूपात संपन्न झाला!

सिनेअभिनेत्री मधुराणी गोखले-प्रभुलकर यांच्यासोबत महिलांनी मनमुराद गाण्यांच्या तालावर ठेका धरत जल्लोष साजरा केला. या सोहळ्यात हळदी-कुंकू समारंभ, मराठी लोकगीतांचा ऑर्केस्ट्रा, नृत्याविष्कार, लकी ड्रॉ, पैठणी बक्षिसे आणि महिलांसाठी विशेष भेटवस्तू दिल्या.



## नवी मुंबई पालिका कर्मचारीच उघड करताहेत तक्रारकर्त्यांची नावे

### फेरीवाल्यांपासून पदपथ मुक्त करण्याची भाजपची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेकडे लेखी तक्रारी केल्यावर पदपथ, रस्ते फेरीवाल्यांच्या अतिक्रमणातून मुक्त करण्याची कारवाई करण्याएवजी तुर्भे विभाग कार्यालय फेरीवाल्यांना तक्रारकर्त्यांची नावे पालिकेतील भ्रष्ट कर्मचारी सांगत आहेत. अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याकडे निवेदनातून केली आहे

सानपाडा सेक्टर सातमधील महापालिकेच्या सिताराम मास्तर उद्यानातील पदपथ अतिक्रमणाच्या विळख्यातून व बकालपणातून मुक्त करण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिकेकडे केली होती . रविवार (दि. ९ फेब्रुवारी) मानखुर्द-गोवंडी भागातील टपोरी फेरीवाले तक्रारकर्त्यांना शोधत असल्याचे आढळून आले. त्यामुळे पालिकेच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे सानपाड्यातील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचा आरोप आमले यांनी केला आहे.



सानपाडा परिसर बकालपणातून तसेच पदपथ फेरीविकेत्यांच्या अतिक्रमणातून मुक्त व्हावेत यासाठी आम्ही महापालिका मुख्यालय तसेच तुर्भे विभाग कार्यालयात सातत्याने लेखी पाठपुरावा करत आहोत. सानपाडा रेल्वे स्टेशनबाहेरील रस्ते, पदपथ तसेच सानपाडा सेक्टर सातमधील सिताराम मास्तर उद्यानालगतचे पदपथ फेरीवाल्यांच्या विळख्यातून मुक्त झालेले नाहीत. फेरीवाले आजही राजरोसपणे त्या ठिकाणी व्यवसाय करत आहेत. पालिका प्रशासनाला एकतर ते जुमानत नसावेत अथवा पदपथावरील त्यांच्या अतिक्रमणाला महापालिकेची संमती असावी.

परिसराच्या स्वच्छतेसाठी, बकालपणा घालविण्यासाठी, पदपथावरील, रस्त्यावरील अतिक्रमण हटवण्यासाठी पाठपुरावा करत असल्याने तुर्भे विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांमुळे सामाजिक कार्यकर्त्यांच्या जिविताला धोका निर्माण होऊन मस्साजोगचे सरपंच देशमुख यांच्यासारखेच प्रकार होण्याची भीती निर्माण झालेली आहे. याबाबत आम्ही आमचे नेते, राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तुर्भे विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या नावानिशी तक्रारी करुन त्यांची नार्को व लाय डिटेक्टर टेस्ट करण्याची मागणी करणार असल्याचे पांडुरंग आमले यांनी निवेदनात म्हटले आहे.

सानपाडा सेक्टर सातमध्ये महापालिकेचे सिताराम मास्तर उद्यान आहे. या उद्यानालगतच्या पदपथावर लाकडी ठोकळे, ओंडके पडलेले आहेत. त्यामुळे स्थानिकांना पदपथावरून चालणे अवघड झाले आहे. या उद्यानाच्या संरक्षक भिंतीलगतच्या पदपथावर फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने रहीवाशांना पदपथाऐवजी रस्त्याचा वापर करावा लागत आहे. यामुळे उद्यानात येणाऱ्या ज्येष्ठांना त्रास सहन करावा लागत आहे. उद्यानालगतचा पदपथ कायस्वरुपी फेरीवाल्यांच्या अतिक्रमणातून मुक्त करण्याचे मागणी पांडुरंग आमले यांनी केली आहे.

पान १ वरून

## टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राची स्वस्तिका घोष अंतिम फेरीत

पृथा हिने उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राच्याच सायली वाणी हिच्यावर ११-८,११-७,११-८ अशी सरळ तीन गेम्स मध्ये मात केली. तिने या लढतीत काऊंटर अटॅक पद्धतीचा खेळ केला तसेच प्लेसिंगचाही कल्पकतेने उपयोग केला. या स्पर्धेमध्ये तिला भारतीय टेबल टेनिस महासंघातर्फे विशेष प्रवेशिका देण्यात आली आहे.

सकाळच्या सत्रात अग्रमानंकित दिया चितळे हिला खांदा दुखावल्यामुळे पृथा वर्टीकर या आपल्या कनिष्ठ सहकारी खेळाडूविरुद्ध माघार घ्यावी लागली. चुरशीने झालेल्या या सामन्यातील पहिली गेम दिया हिने ११-५ अशी घेतली मात्र पृथाने ११-८ अशी घेत सामन्यातील उत्कंठा वाढवली तथापि पुन्हा दियाने ११-७ अशी तिसरी गेम घेत दोन एक अशी आघाडी घेतली. चौथ्या गेम मध्ये तिने ६-१ अशी भक्कम आघाडी देखील मिळवली होती मात्र तेथून टॉप स्पीन फटके व चॉप्सचा उपयोग करत पृथाने ही गेम १३-११ अशी घेत सामन्यात दोन-दोन अशी बरोबरी साधली. ही गेम सुरू असताना दिया हिच्या उजव्या खांद्यात वेदना सुरू झाल्या. तात्पुरते उपचार करीत तिने चौथी गेम खेळली. पाचव्या गेममध्ये पृथाकडे २-० अशी आघाडी असताना दिया हिने दुखापतीच्या कारणास्तव सामना सोडून दिला.

## ई-श्रम मोबाईल ॲपबाबत जनजागृती व नोंदणी शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

दत्तोपंत ठेंगडी राष्ट्रीय कामगार शिक्षण व विकास बोर्ड, प्रादेशिक संचालनालय, मुंबई, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने तीन दिवसीय जनजागृती व नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. हे शिबिर माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान कर्जत यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होत. ज्यामध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांना विविध सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये नोंदणी करण्याची संधी मिळाली.



कार्यक्रमाचे उद्घाटन श्रम मंत्रालय वरिष्ठ अधिकारी साक्षी चुग यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, कामगार शिक्षण मंडळाचे शिक्षण अधिकारी चंद्रसेन जगताप, लिलाधर देवळे, सुभाष मदन आदी उपस्थित होते. या उपक्रमाचा मुख्य उद्देश कामगारांना ई - श्रम, आयुष्मान भारत, पीएमएसएमवाय, विश्वकर्मा योजना, एनपीएस आणि एनसीएस नोंदणी यांसारख्या सरकारी कल्याणकारी योजनांमध्ये समाविष्ट करून त्यांना सामाजिक सुरक्षा लाभ सहजपणे उपलब्ध करून देणे हा होता.

सहभागी कामगारांना ई-श्रम मोबाईल ॲप ची थेट चाचणी व प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. लवकरच हे ॲप सरकारद्वारे लॉंच केले जाणार असून असंघटित क्षेत्रातील कामगारांना विविध सरकारी योजनांचा थेट आणि सोपा लाभ मिळवून देणार आहे. उपस्थित कामगारांनी आपल्या अँड्रॉइड स्मार्टफोनवर हे ॲप यशस्वीरित्या इंस्टॉल व चाचणी करून त्याचा अनुभव घेतला. जो डिजिटल सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या शिबिरात असंघटित क्षेत्रातील कामगारांनी सहभाग घेतला आणि हँड्स - ऑन प्रशिक्षण व जनजागृती सत्रांद्वारे महत्त्वपूर्ण माहिती मिळवली.

## वाशी-कोपरखैरणे येथे बस स्टॉपचे लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या आमदार निधी मधून रु. ६ लाख खर्च करून वाशी विभागातील वामन हरी पेठे ज्वेलर्स समोर, वाशी-कोपरखैरणे रोड, सेक्टर - १० येथे बस स्टॉपचे लोकार्पण ज्येष्ठ नागरिक गुणाजी कोकाटे यांच्या शुभहस्ते झाले.



अनेक वर्षापासून सदर ठिकाणी जीर्ण अवस्थेतील बस स्टॉप अद्यावत करण्याची मागणी वाशी विभागातील शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांकडून होत होती. सदर मागणीची दखल घेत आमदार निधी विकास अंतर्गत रु. ६ लाख खर्च करून सदर बस स्टॉप उभारल्याने वाशी विभागातील प्रवाशांनी सोय झाली असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले.

यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक राजू शिंदे, माधवी शिंदे, विकास सोरटे, विक्रम पराजुली, जयंत पाटील, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, प्रमिला खडसे, प्रवीण भगत, जेम्स आवारे, राखी पाटील, सुमा रंजिता, पदम पांडे, अतुल भालंगे, तानाजी शिंदे उपस्थित होते.

## अलिबाग दरोडा प्रकरण; सांगलीतून रक्कम हस्तगत

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वस्तात सोनं देतो सांगून दोघा सराफांची लुटून नेलेली रक्कम रायगड पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने हस्तगत केली आहे. लुटलेल्या दीड कोटी रूपयांपैकी १ कोटी ४९ लाख ८३ हजार हस्तगत करण्यात आले आहेत. ही रक्कम लपवुन ठेवण्यास मदत करणारे विशाल पिंजारी व अक्षय खोत यांना पोलीसांनी अटक केली आहे. दरम्यान, या गुन्हयातील आरोपी शंकर कुळे व पोलीस हवालदार हनुमंत सूर्यवंशी हे अद्यापही फरार आहेत.

समाधान पिंजारी याने त्याच्या गावातील सराफ नामदेव हुलगे याला स्वस्तात सोनं देण्याचे आमिष दाखवले त्यासाठी दीड कोटी रूपये जमवले. समाधान पिंजारी हा त्यांला घेवून अलिबागकडे आला. तिनविरा धरणाजवळ दोघा पोलीस कर्मचारयांचया मदतीने पोलीस आल्याचा बहाणा करून त्यांची दीड कोटींची रक्कम लंपास केली. याप्रकरणी पोयनाड पोलीसात तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी समाधान पिंजारी त्याचा सहकारी दीप गायकवाड, पोलीस अंमलदा रसमीर म्हात्रे आणि विकी साबळे यांना अटक केली.

पळवून नेलेली रक्कम आरोपींनी सांगली जिल्हयातील आटपाडी येथे लपवून ठेवली होती ही रक्कम विशाल पिंजारी व अक्षय खोत यांच्या ताब्यात दिली. दोघांनी ही रक्कम सांगलीतील आटपाडी येथे नेउन लपवून ठेवली होती.

# पंतप्रधान मोदींच्या परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाचे सीकेटी विद्यालयात प्रक्षेपण; विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुम्ही परीक्षेचं टेन्शन घेऊ नका. इतर विद्यार्थ्यांना किती मार्क मिळतात त्याकडे पाहू नका. तुम्ही काय करू शकता हे पाहा, असं सांगतानाच ज्या विषयाची भीती वाटते, त्या विषयाची आधी तयारी करा, असा कानमंत्रच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे.



भारत मंडपम् नवी दिल्ली येथे परीक्षा पे चर्चा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी बोर्डाच्या परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यंदाचे हे आठवे वर्ष आहे.यावेळी परीक्षा पे चर्चा २०२५ हा केवळ परीक्षेचा ताण आणि मानसिक स्थितीशी संबंधित नाही, तर तरुणांना कोणत्या प्रकारच्या संधी मिळतील आणि भविष्यात भारताला विकसित भारत बनवण्यात विद्यार्थी काय योगदान देतील यावरही चर्चा केली.

आजच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांची सर्व स्वप्ने आणि उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी त्यांना मदत करण्यासाठी आणि सक्षम करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधला. बंद सभागृहात विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकांशी चर्चा करण्याची पद्धत या वर्षी दूर ठेवून दिल्लीतील सुंदर नर्सरी भागातील एका विशाल झाडाच्या सावलीत, निसर्गाच्या सान्निध्यात पंतप्रधान मोदी यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

या कार्यक्रमात विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ३५ विद्यार्थी सहभागी झाले. या वेळी मोदी म्हणाले की, ज्ञान आणि परीक्षा या दोन भिन्न गोष्टी आहेत. परीक्षा हेच सर्वस्व आणि जीवनातील अंतिम गोष्ट आहे असे मानू नये, असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन केले पाहिजे. मिळालेल्या वेळेचा चांगला उपयोग करता आला पाहिजे. दुसऱ्या दिवसाचे नियोजन करावे. विनाकारण वेळ घालवू नका. गप्पांमध्ये किंवा इतर विषयांवर बोलण्यापेक्षा परीक्षेवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. अभ्यासाची तयारी करताना व्यवस्थित जेवण करा. पुरेशी झोप झाला पाहिजे, याकडेही लक्ष दिले पाहिजे असे ही सांगितले .

दुर्दैवाने असा सामान्य समज आहे की एखाद्याला १२ वी आणि १० वीच्या परीक्षांमध्ये चांगले गुण मिळाले नाही तर त्याचे आयुष्य वाया जाते. आपल्या समाजात कमी गुणांवरून घरामध्ये तणावाचे वातावरण असते. तुमच्यावरही दबाव असू शकतो पण त्याची चिंता न करता तयारी करा आणि स्वत:ला आव्हान देत राहा. शिक्षणासोबत कौशल्ये महत्वाचे

पालकांबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, प्रत्येक पालकाच्या काही अपेक्षा असतात. दुसऱ्यांची मुले पाहिल्यानंतर त्यांचा स्वत:चा अहंकार दुखावला जातो. त्यांची सामाजिक स्थितीच त्यांच्यासाठी अडथळा बनते. पालकांना माझे आवाहन आहे की तुम्ही तुमच्या मुलाला सर्वत्र आदर्श बनवू नका. जगातले प्रत्येक मूल सारखे नसते. काही मुले खेळात चांगली असतात तर अभ्यासात कमकुवत असतात. त्यांच्या पालकांनी आणि शिक्षकांनी त्यांच्यातील लपलेल्या प्रतिभेला वाव देणे आवश्यक आहे.

पंतप्रधान मोदींनी शिक्षकांना सांगितले की विद्यार्थ्यांमध्ये तुलना होऊ नये, कोणत्याही विद्यार्थ्याला इतर विद्यार्थ्यांमध्ये व्यत्यय आणू नये. यामुळे त्यांचे मनोबल कमी होणार नाही आणि ते पुढे शिकण्याचा प्रयत्न करतील. मुलांनी अशी व्यक्ती शोधली पाहिजे जी त्यांना सतत प्रेरित करत राहील. माणसाने नेहमी स्वत:ला पराभूत करायला शिकले पाहिजे. यासाठी, स्वत:चे ध्येय ठेवणे आणि ते पूर्ण केल्याबद्दल स्वत:ला बक्षीस देणे महत्वाचे आहे. असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हंटले आहे.

सध्या परीक्षेचे दिवस सुरू आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात धाकधूक निर्माण झालेली आहे. पेपर कसे जातील याची चिंता विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थी परीक्षेचं टेन्शन घेतानाही दिसत आहेत. आज देशभरातील या विद्यार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवाद साधला.

यावेळी सी.के.टी विद्यालयातील ५ वी ते १० वी च्या एकूण १२२४ विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट बोर्ड वर परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाचे प्रक्षेपण उपलब्ध करून देण्यात आले होते. ५वी ते १० च्या सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

## कोन फाट्याजवळ एसटी बस उलटून चौघे जखमी



**पनवेल: वार्ताहर**

पनवेल महामार्गावर कोन फाट्यावर असलेल्या क्रेझी बॉईज बार समोर भीषण अपघाताची घटना बुधवारी दुपारी घडली असून यामध्ये बस चालकासह इतर तीन प्रवाशी जखमी झाले आहेत

वाशिवली ते पनवेल जाणारी एसटी बस क्रमांक एमएच २० बीएल ३३३४ ही झाडाला भरधाव वेगात धडकुन रस्त्यावर पलटी झाली.या अपघातात बसच्या समोरील भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे.या भीषण दुर्घटनेत बस चालकासह ३ ते ४ प्रवासी जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. जखमींना तात्काळ एमजीएम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी रवाना करण्यात आले आहे.

या भीषण अपघाताने एसटी बसमधील प्रवासी चांगलेच भांबावले होते. साधारण ५० प्रवासी या बसमधून प्रवास करीत होते. अपघाताची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस आणि नवीन पनवेल ट्राफिक पोलीस पोचले असून जखमींना मदतकार्य आणि वाहतुकीचे नियोजन सुरु केले.

बस रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला धडकल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. कोन गावातील या रस्त्यावर अनेक दुकाने आणि टपर्या आहेत. त्यामुळे झाडाला धडकून बस तिथेच पलटी झाली आणि सुदैवाने आसपासची दुकाने आणि टपर्या यामुळे बचावल्या. हायड्र च्या मदतीने एसटीबस रस्त्याच्या बाजूला घेण्यात आली आहे.

# वीर वाजेकर महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात



**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या विरवाजेकर महाविद्यालय महालण विभाग फुंडे ( उरण) येथे माजी विद्यार्थी संघ व महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भावनाताई घाणेकर, महाविद्यालय विकास समिती सदस्या यांनी मी वीर वाजेकर महाविद्यालयातून शिकले याचा मला सार्थ अभिमान आहे व या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

प्रोफेसर एस के पाटील, प्राचार्य, सीकेटी महाविद्यालय, पनवेल यांनी माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयास जी काही मदत लागेल ती मदत करण्यास आपण बांधील आहोत असेही त्यांनी सांगितले

माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष सुधीर घरत यांनी आपल्या मनोगतातून महाविद्यालयाच्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेत माजी विद्यार्थी सर्वोतोपरी सहकार्य करतील,या महाविद्यालयाच्या विकास समिती सदस्य ते माजी विद्यार्थी म्हणून मी तसेच सर्व माजी विद्यार्थी महाविद्यालयाला -++ ग्रेड कशी मिळेल त्यासाठी संपूर्ण मदत व सहकार्य करणार असल्याचे सांगितले. शिवेंद्र म्हात्रे असिस्टंट जनरल मॅनेजर जी टी आय यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थी दशेतील आठवणी गुरुजनांकडून मिळालेलं उत्कृष्ट मार्गदर्शन व आज माजी विद्यार्थी म्हणून महाविद्यालयास कोणत्या स्वरूपात मदत करू शकतो याचे विवेचन केले.

जिल्हाध्यक्ष मनसे संदेश ठाकूर यांनी ते स्वतः विद्यार्थी देशात कसे होते महाविद्यालयाकडून मिळालेल्या शिक्षणाचा आणि मार्गदर्शनाचा फायदा आज समाजात नेतृत्व करण्यासाठी कशी उपयोगी पडते हे प्रांजलपणे मांडले. पूरक विविध उपक्रमांमध्ये सहकार्य करणार असल्याचे सांगितले.

## बारावी परीक्षेला कळंबोली केंद्रातून २२३५ विद्यार्थी , अंध अपंग गतिमंदांचा समावेश

कळंबोली : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या आज राज्यभरातून सुरुवात झाली आहे .पनवेल मधील कळंबोली केंद्रातून तब्बल २२३५ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले आहेत. कळंबोली केंद्रातून अंध ,गतिमंद, अपंग तसेच कॅन्सरग्रस्त एका विद्यार्थ्याच्या सहभाग आहे. परीक्षेच्या पहिल्या दिवशी केंद्रप्रमुख संजय पाटील यांच्याकडून विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन व आनंदमय वातावरणात हार्दिक शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले.

कळंबोली वसाहती मधील सुधागड विद्या संकुलात बारावीचे परीक्षा केंद्र आहे. या परीक्षा केंद्राअंतर्गत एकूण सात शाळांमधून तब्बल २२३५ विद्यार्थी आहेत. यामध्ये सुधागड विद्या संकुलातील ८५१,सन ग्लोबल हायस्कूल तळोजा २९,रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर ३७८, कळंबोलीतील केलई कॉलेज ४१०, प्रयेश विद्यालय ४०, द.ग. तटकरे विद्यालय २०९, सेंट जोसेफ विद्यालय ३१४ असे विविध शाळांतील विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ट झाले आहेत.एक केंद्रप्रमुख ,दोन पर्यवेक्षक व अन्य पाच कर्मचारी या परीक्षेवर नियंत्रण ठेवणार आहेत. परीक्षा सुरक्षित निकोप आनंदमय वातावरणात देता यावी यासाठी शाळा शिक्षण विभाग यांच्याकडून चोख व्यवस्था तैनात करण्यात आली आहे .

परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस सुरक्षाही तैनात करण्यात आली आहे. एकूण २४ प्रादेशिक भाषांमधील विषयांची परीक्षा ही या परीक्षा दरम्यान असणार आहे.

या परीक्षा दरम्यान एक अंध विद्यार्थी ही परीक्षा देणार आहे त्यासाठी स्वतंत्र पेपर लिहिण्याची व्यवस्था ही विद्यालयाकडून करण्यात आली आहे व त्याला पेपर लिहिणारा सहाय्यकही शासनाच्या अटी व नियमानुसार देण्यात आलेला आहे या केंद्रावर ती एक कॅन्सर ग्रस्त विद्यार्थी ही आपली परीक्षा देऊन आपले कसब पणाला लावणार आहे. गतिमंद अस्थी व्यंग विद्यार्थी ही या परीक्षेत समाविष्ट झालेले आहेत .या ६ अपंग विद्यार्थ्यांना सुखमय ,सुरक्षित ,आनंदमय वातावरणात परीक्षा देता यावी यासाठी केंद्र संचालकांनी विशेष उपाययोजना केली असल्याचेही सांगण्यात आले.

## पिरकोनला श्री गणेश महिला बचत गटाचा हळदी कुंकू समारंभ

**उरण : रामप्रहर वृत्त**

पिरकोन गावात श्री गणेश महिला बचत गट यांच्यावतीने हळदी कुंकू समारंभ झाला. या कार्यक्रमास निता महेश बालदी यांनी उपस्थीत राहुन शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर निशाताई म्हात्रे भाजप चिटणीस उरण तालुका महिला मोर्चा,मुकुंद गावंड उरण तालुका उपाध्यक्ष,भागाबाई गावंड माजी सरपंच,राजश्री म्हात्रे माजी उपसरपंच,युवा नेते नरेंद्र गावंड,कमलाकर गावंड बूथ अध्यक्ष,महिला कार्यकर्त्या कवीता गावंड,सरिता गावंड आणि महिला भगिनी उपस्थित होत्या.दत्तात्रेय दुबळे यांनी दहा हजार रुपयांची मदत केली.





**पनवेल : महपालिकेच्या मुख्यालयात बुधवारी गुरू रविदास यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. या वेळी आयुक्त मंगेश चितळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी आदी उपस्थित होते.**

## माळरान ते हिरवाई; निर्जीव वन जमिनीला केले हरित समृद्ध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पडीक असलेल्या निर्जीव वनजमिनीला दीपक फर्टिलायझर्सने हरित करत समृद्ध केल्याने म्हाळुंगी येथील वनजमीन माळरान ते हिरवाई अशा प्रवासाने पुनर्जीवित झाली.



तळोजा येथील दीपक फर्टिलायझर्सच्या प्रकल्पापासून अवघ्या ५ किलोमीटर अंतरावर असलेली ही जमीन निर्जीव अवस्थेत होती. आणि त्यामुळे निसर्गाची कुजबुज ओसरल्यासारखी वाटत होती, एक उजाड माळरान मागे सोडले होते, पण आशा हरपली नव्हती.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) आणि पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या सूचनेनुसार दीपक फर्टिलायझर्सने या १७.०६ एकर जागेत पुन्हा वृक्षांना जीवदान देण्याचे आव्हान स्वीकारले. आणि त्या अनुषंगाने गेल्या तीन वर्षांच्या अथक प्रयत्नांमुळे एकेकाळी निर्जीव झालेल्या वनक्षेत्राचे रूपांतर हरित परिसंस्थेत झाले आहे. एकेकाळी उजाड आणि ओसाड असलेला हा भाग आता जिवंत अधिवास, वनस्पती आणि प्राण्यांचे आश्रयस्थान म्हणून उभा राहिला आहे.

दीपक फर्टिलायझर्सचे अध्यक्ष (मॅन्युफॅक्चरिंग) मुकुल अग्रवाल यांनी संदर्भात सांगितले कि, आमचे वन विकास प्रकल्प हे पर्यावरण संवर्धन आणिसामुदायिक कल्याणासाठी आमच्या अढळ बांधिलकीचे प्रतिबिंब आहेत. आमचा असा विश्वास आहे की, हवामान बदलाचा सामना करण्यासाठी, जैवविविधता सुधारण्यासाठी आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी शाश्वत भविष्य घडविण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे आहेत. दीपक फर्टिलायझर्सने या भागात एकूण २ कोटी २० लाख रुपयांची गुंतवणूक करून विविध प्रकारच्या औषधी, फळेदेणारी आणि देशी प्रजातींसह १३,४२० झाडे लावली आहेत.

कल्याण वनपरिक्षेत्रांतर्गत पिसावली गावाजवळील ५० एकर जागेत धावडी येथे दीपक फर्टिलायझर्सचा पहिला वन विकास उपक्रम सात वर्षांत राबविण्यात आला. १ कोटी ८२ लाख रुपयांच्या गुंतवणुकीच्या या प्रकल्पात २२ हजार २०० वृक्षांची यशस्वी लागवड करण्यात आली. हे उपक्रम नीती आयोगाने नमूद केल्याप्रमाणे ३३ टक्के वन आणि वृक्षाच्छादन साध्य करण्याच्या भारताच्या मोठ्या उद्दिष्टाशी सुसंगत आहेत.

## शहर पोलीस ठाण्यात उद्योजकांची बैठक

**पनवेल : वार्ताहार**

महाराष्ट्र शासन, क्षेत्रीय कार्यालयांसाठीच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत मंथन हॉल पनवेल येथे पनवेल शहर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील उद्योजक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

पनवेल शहर वपोनि नितीनठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित उद्योजकांना येणार्या अडीअडचणी जाणून घेण्यात आल्या. त्यामध्ये प्रामुख्याने एमआयडीसी परिसरात पोलीस गस्त वाढविणे, माथाडी कामगार यांच्यापासून होणारा त्रास, एमआयडीसी परिसरात येणार्या जड अवजड वाहनांचा प्रवेश बाबत, अमरधाम सिग्नल कार्यान्वित करून वाहतूक पोलीस नेमणे, डिझेल चोरी व इतर समस्या अवगत केल्या.

सदर समस्यांबाबत उपस्थितांची चर्चा करून वरील समस्या तात्काळ सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन यावेळी अधिकारी वर्गाने दिले. त्याचप्रमाणे त्यांना सायबर सुरक्षा, नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन केले



## पोलिसांकडून १६३ फिर्यादींना चोरी झालेले मोबाईल परत

**पनवेल : वार्ताहर**

रबाळे पोलिसांनी आपल्या हद्दीतील चोरीस गेलेल्या आणि गहाळ झालेल्या सुमारे २५ लाख रुपये किंमतीच्या १६३ मोबाईल फोनचा शोध घेऊन सदर मोबाईल फोन संबंधित फिर्यादींना वाशी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अदिनाथ बुधवंत यांच्या हस्ते परत केले. या वेळी हरवलेले आणि चोरीला गेलेले आपले मोबाईल फोन परत मिळाल्याने नागरिकांनी पोलिसांचे कौतुक करुन त्यांचे आभार मानले.



गहाळ झालेल्या मोबाइल फोनचा शोध घेण्याकरिता केंद्र सरकारने सीईआयआर असे पोर्टल कार्यान्वित केले आहे. या पोर्टलचा वापर करुन नागरिकांच्या हरवलेल्या मोबाइल फोनचा शोध घेण्याच्या स्रूचना वरिष्ठ अधिकार्यांकडून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार रबाले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी रबाले पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या चोरीस गेलेल्या आणि गहाळ झालेल्या मोबाईल फोनचा सीईआयआर पोर्टलवरुन आढावा घेऊन त्या मोबाईल फोनचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश पाळदे, तपास पथकातील अंमलदार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अरुण पवार आणि त्यांच्या पथकाने हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्याचे काम सुरु केले होते. या तपास पथकाने सीईआयआर पोर्टलचा वापर करुन मिळालेल्या माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तांत्रिक तपास करुन १६३ नागरिकांचे चोरीला गेलेले आणि गहाळ झालेले मोबाईल फोन हस्तगत केले.

सीईआयआर पोर्टलच्या आधारे शोध घेतलेल्या सुमारे २५.१० लाख रुपये किंमतीचे १६३ मोबाईल फोन संबंधित नागरिकांना रबाले पोलीस ठाण्यामध्ये बोलावून त्यांना परत करण्यात आल्याने नागरिकांनी पोलिसांचे विशेष आभार मानले.

## संपादकीय

# ब्रिटनमध्येही कारवाई!

अमेरिकेपाठोपाठ ब्रिटनमध्येही बेकायदा स्थलांतरितांविरोधात कारवाईचा बडगा उगारला जात असून यामागे तेथील अंतर्गत राजकारणही आहे. अलीकडच्या काळात तेथील 'रिफॉर्म पार्टी'ची लोकप्रियता वाढली असून घुसखोरांच्या प्रश्नावर हा पक्ष जनतेचा पाठिंबा मिळवतोय. परिणामी, त्या देशातील सत्ताधारी पक्षालाही बेकायदा स्थलांतरितांविरोधातील मोहिमेचा गाजावाजा करणे भाग पडते आहे. ब्रिटनमध्ये सुमारे पावणेसात लाख बेकायदा स्थलांतरित असून त्यात भारतीयांची संख्या मोठी आहे.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत परतल्यानंतर लगेचच अमेरिकेतील बेकायदा स्थलांतरितांविरोधात कारवाई सुरू केली. भारतासह मेक्सिको, ब्राझील, कोलंबिया आदी देशांमधील नागरिकांना त्यांनी परत मायदेशी पाठवले. ट्रम्प यांच्या या कारवाईचा जागतिक स्तरावर बराच गवगवा झाला. आता ट्रम्प यांच्या पावलावर पाऊल टाकत ब्रिटनने देखील तशाच कारवाईचा गाजावाजा सुरू केला आहे. खरे तर गेले अनेक महिने ब्रिटनकडून हे धोरण राबवले जात असून आतापावेतो १९ हजार बेकायदा स्थलांतरितांना ब्रिटनने देशाबाहेर काढले आहे. ब्रिटनमध्ये लेबर पार्टी सत्तेवर आल्यापासून ही कारवाई सुरू झाली. गेल्या वर्षीपेक्षा यंदाच्या जानेवारी महिन्यात जवळपास दुप्पट ठिकाणी छापे टाकण्यात आले. घुसखोरांना शोधण्यासाठी देशभरात छापेमारी करण्यात येत असून बेकायदा स्थलांतरितांना मायदेशी परत पाठवत असल्याचा एक व्हिडिओही ब्रिटिश सरकारने शेअर केला आहे. या मोहिमेअंतर्गत भारतीय रेस्टॉरंट, बार, स्टोअर आदींवर छापे टाकण्यात आले असे मथळे तेथील वृत्तपत्रांत झळकले. प्रत्यक्षात मात्र छापे टाकलेल्यांपैकी फक्त काही हॉटेले व दुकाने भारतीय होती असे सांगितले जाते. अशा ठिकाणी बेकायदा स्थलांतरितांना मोठ्या प्रमाणात नोकरीस ठेवले जाते अशी माहिती मिळाल्यामुळे हे छापे टाकण्यात आले. बेकायदा स्थलांतरितांना नोकऱ्या देणाऱ्या संस्थांवरही दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. आजच्या घडीला ब्रिटनमध्ये सुमारे पावणेसात लाख बेकायदा स्थलांतरित असून त्यात भारतीयांची संख्या सर्वात मोठी असल्याचे सांगितले जाते. विविध क्षेत्रांमध्ये कमी मोबदल्यात श्रमाची कामे करणारे मनुष्यबळ यातूनच मिळते. त्यामुळे, स्थानिकांचा विरोध लक्षात घेऊन या बेकायदा स्थलांतरितांवर कारवाई करावी की या कमी मोबदल्यातील मनुष्यबळाचा वापर करावा असा पेच ब्रिटनमध्ये अनेक वर्षे आहे, परंतु अलीकडच्या काळात तेथील रिफॉर्म पार्टीची लोकप्रियता झपाट्याने वाढत असून घुसखोरांच्या मुद्यावर हा पक्ष जनतेचा पाठिंबा मोठ्या प्रमाणावर कमावतो आहे हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सत्ताधारी पक्षालाही बेकायदा स्थलांतरितांविरोधात कारवाई करण्याची भूमिका घेणे भाग पडते आहे. येत्या आठवड्यात त्यामुळे ब्रिटिश संसदेसमोर सीमा सुरक्षा, बेकायदा स्थलांतरितांना आश्रय व त्यांची परतपाठवणी या विषयीचे विधेयक मांडले जाणार आहे. त्यामुळेच सध्या ब्रिटनमध्ये बेकायदा स्थलांतरितांविरोधातल्या मोहीमेचा हेतुपुरस्सर गाजावाजा केला जात आहे. जानेवारी महिन्यात ब्रिटनमध्ये सुमारे आठशे ठिकाणी छापे घालण्यात आले. यात काही भारतीय हॉटेल व दुकानांचा समावेश होता, पण गाजावाजा त्यांचाच करण्यात आला. भारतासह पाकिस्तान आणि बांगलादेशातून येणारे स्थलांतरित इंग्लिश खाडी पार करून ब्रिटनमध्ये बेकायदा प्रवेश करतात. हे स्वस्तात मिळणारे मनुष्यबळ तेथील हॉटेल व दुकानचालकांना सोयीचे पडते. अनेक विद्यार्थीही व्हिसाची मुदत संपली तरी तेथेच राहून रोजगार मिळवतात. या साऱ्यातूनच तेथे बेकायदा स्थलांतरितांचा प्रश्न निर्माण झाला आहे. बेकायदा स्थलांतरितांमुळे कायदेशीर मार्गाने ब्रिटनमध्ये स्थिरावून उत्तम कामगिरी करणाऱ्या स्थलांतरितांचे श्रेयही हिरावले जाते आहे.**

# अभिजात मराठी : ऐतिहासिक वारसा आणि शास्त्रशुद्ध अधिष्ठान

दिल्लीत होत असलेले ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे उद्घाटनही याला अधिक महत्त्व प्राप्त करून देईल. अशा या विशेष संमेलनानिमित्त 'मराठी भाषा ते अभिजात मराठी भाषा' या प्रवासाचा आढावा घेणारे संकलन...




मराठी भाषेचा उगम : ऐतिहासिक ठसा

मराठी भाषेचा उगम केवळ श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वरच्या शिलालेखात सापडत नाही, तर तिची मुळे अधिक खोल आणि प्राचीन आहेत. लिखित पुराव्यांचा शोध घेतल्यास, सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीचा पहिला लिखित ग्रंथ 'गाथा सप्तशती' आढळतो. सातवाहन राजा हाल याने गोदावरी खोऱ्यातील कविंच्या रचनांचे संकलन करून हा ग्रंथ संपादित केला. यातील भाषा महाराष्ट्री प्राकृत होती, जी मराठीच्या उगमस्थानी आहे.

परंतु, यापूर्वीही महाराष्ट्री प्राकृत अस्तित्वात होती का? याचे उत्तर 'होय' असेच आहे. याचा ठोस पुरावा इ.स.पूर्व ३०० मध्ये वररुची (कात्यायन) यांनी लिहिलेल्या 'प्राकृत प्रकाश' या ग्रंथात सापडतो. हा ग्रंथ प्राकृत भाषेचे व्याकरण स्पष्ट करणारा असून, त्यात महाराष्ट्री प्राकृतसह मागधी, अर्धमागधी, पैशाची आणि पाली भाषेचाही समावेश आहे. त्यामुळे मराठी भाषेचा उगम किमान २३०० वर्षांपूर्वीचा असल्याचे निश्चित होते.

ज्ञानेश्वरी ते आधुनिक मराठी : भाषा परिपक्वतेचा प्रवास

कोणतीही भाषा पूर्णतः व्याकरणबद्ध स्वरूपात यायला काही शतकांचा काळ लागतो. १२व्या शतकातील ज्ञानेश्वरी ही महाराष्ट्री प्राकृतची परिष्कृत आवृत्ती म्हणता येईल. ज्ञानेश्वरांचे समकालीन संत नामदेव, मुकुंदराज, म्हाइंभट आणि त्यानंतर संत एकनाथ, संत तुकाराम यांच्या साहित्यातून मराठी अधिक स्थिरावत गेली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोश' तयार करून राजव्यवहारासाठी मराठीला सशक्त केले. धुंडीराज व्यास आणि रघुनाथ पंडित अमात्य यांनी हा कोश लिहिला होता. पुढे १८व्या शतकात दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी १८३६ मध्ये 'मराठी भाषेचे व्याकरण' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला.

**अभिजात भाषेचे निकष आणि मराठी**

भारत सरकार कोणत्याही भाषेला अभिजात दर्जा देताना पुढील महत्त्वाचे निकष विचारात घेते, त्यात

१. प्राचीनतेचा पुरावा: भाषेचा इतिहास किमान १५०० ते २००० वर्षांपर्यंत मागे जाणारा असावा.

२. स्वतंत्र व्याकरण आणि लेखन परंपरा: भाषा केवळ बोली स्वरूपात नसून शास्त्रशुद्ध व्याकरण आणि साहित्यपरंपरा असावी.

३. मौलिक साहित्य ठेवा: ज्ञानपरंपरा असलेले ग्रंथ आणि साहित्य शतकानुशतके उपलब्ध असावे.

४. सतत वापर आणि टिकाऊपणा: भाषा अद्यापही लोकांमध्ये व्यापक प्रमाणावर वापरली जात असावी.

मराठी भाषा या सर्व निकषांमध्ये योग्य ठरली.म्हणून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.

सातवाहन काळातील महाराणी नागनिका हिने नाणेघाटात कोरलेला शिलालेख आणि महाराष्ट्रातील लेण्यांमधील अनेक शिलालेख हे आद्य भाषेचे महत्त्वाचे ऐतिहासिक पुरावे आहेत.

मराठीला अभिजात दर्जा : ऐतिहासिक निर्णय

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. श्रीकांत बहुलकर, प्रा. मधुकर वाकोडे, सतीश काळसेकर, डॉ. कल्याण काळे, प्रा. आनंद उबाळे, परशुराम पाटील, डॉ. मैत्रेयी देशपांडे आणि अन्य विद्वानांनी केलेल्या सखोल अभ्यासानंतर केंद्र सरकारकडे अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार २०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात दर्जा बहाल करण्यात आला.

हा सन्मान मराठी भाषिकांसाठी अभिमानास्पद आहे. यामुळे मराठीसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र, शैक्षणिक अनुदान आणि जागतिक स्तरावर तिची प्रतिष्ठा वाढणार आहे.

दिल्लीतील ऐतिहासिक संमेलन आणि पुढील वाटचाल

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर प्रथमच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीमध्ये होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याने हे संमेलन ऐतिहासिक ठरणार आहे.

यामुळे मराठी भाषा संशोधनासाठी अधिक अनुदान आणि केंद्रे स्थापन केली जातील. मराठीचा शैक्षणिक स्तरावर अधिक व्यापक वापर होईल.डिजिटल माध्यमांत मराठीला अधिक संधी निर्माण होतील.

अभिजात मराठीचा अभिमान

मराठी भाषेत एकूण ४२ बोलीभाषा असल्याचे भारतीय विद्वान मानतात. यामध्ये अहिराणी, वऱ्हाडी, कोळी, आगरी, माणदेशी, तंजावर मराठी, कुणबी, महाराष्ट्रीय कोकणी या प्रमुख बोलीभाषा आहेत.

२००० वर्षांहून अधिकचा इतिहास, समृद्ध साहित्यपरंपरा आणि ऐतिहासिक संदर्भ यामुळे मराठीच्या अभिजाततेचा दर्जा अधिक दृढ झाला आहे. आता या अभिजाततेचा उपयोग करून मराठीला जागतिक स्तरावर अधिक दृढ करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या कार्यात सर्व मराठी भाषकांचाही मोठा सहभाग असणार आहे.

संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेबद्दल अभिमानाने म्हटले आहे–

माझा मराठीची बोलू कौतुके,
परि अमृतातेहि पैजासी जिंके।

या ओळींमधून त्यांनी मराठी भाषेची महती व्यक्त केली आहे. अमृतालाही पैजेने जिंकणारी ही अक्षरे ज्ञानदेवांच्या प्रत्येक शब्दाशब्दांतून प्रकट झाली.

अशी ही आपली मराठी भाषा वैश्विक ज्ञानभाषा होण्यासाठी आपण सर्वजण सतत प्रयत्नशील राहूया!

मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवेत.

**संकलन: युवराज पाटील,**
**जिल्हा माहिती अधिकारी , जळगाव**

# मराठी रंगभूमीवरचे गायकनट भाऊराव कोल्हटकर

लक्ष्मण बापुजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर हे मराठी रंगभूमीवरचे गायकनट होते. त्यांचा जन्म बडोदा येथे ९ मार्च १८६३ला झाला होता. फारसे न शिकलेले भाऊराव, बडोद्याला पोलीस आयुक्तांच्या कार्यालयात नोकरीला होते. मात्र साधे कारकून असलेल्या भाऊरावाना, बडोद्यातील माणसे गायक म्हणून ओळखत. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपल्या नाटकांत स्त्री–भूमिका करण्यासाठी सुंदर रूप आणि गोड आवाज असलेल्या भाऊरावांची निवड केली. भाऊरावांना अभिनयाचे तंत्र गोविंद बल्लाळ देवल यांनी शिकवले. इ.स. १८८२ ते १८८९पर्यंत भाऊराव कोल्हटकरांनी स्त्री भूमिका आणि त्यानंतर १९००पर्यंत सुभद्रेचा अपवाद वगळता, मुखत्वे पुरुष भूमिका केल्या.



अप्रतिम अभिनयामुळे आणि गोड गळ्यामुळे भाऊराव कोल्हटकर यांच्या भूमिका लोकांना अतिशय आवडत. लोक त्यांना प्रेमाने भावड्या म्हणत. पुरुष भूमिका करताना त्यांच्या चढ्या, पल्लेदार आणि सुरेल आवाजामुळे भूमिकांना चांगला उठाव येई.

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या मृत्यूनंतर भाऊराव कोल्हटकर किर्लोस्कर नाटक मंडळीचे भागीदार झाले (इ.स.१८८५). त्यानंतर १६च वर्षांनी म्हणजे १३ फेब्रुवारी १९०१ रोजी भाऊराव यांचे पुणे मुक्कामी निधन झाले. १७ मार्च १९०० रोजी पुण्याच्या आर्यभूषण थिएटरात झालेल्या शारदा नाटकातील कोदंडाची भूमिका त्यांची अखेरची ठरली. त्याच वर्षी मे महिन्यात ते आजारी पडले आणि परत बरे झालेच नाहीत. लक्ष्मण बापुजी उर्फ भाऊराव कोल्हटकर यांचे चरित्र हे पुस्तक कुणी अज्ञात लेखकाने लिहून १९०१ साली प्रकाशित केले आहे.

**(साभार : इंटरनेट)**




## तुमचंही व्हॉट्सअ‍ॅप होऊ शकतं हॅक; 'या' सेटींग करून ठेवा!




सुरक्षित व्हॉट्सप वापरण्यासाठी तुम्हाला काही सेटींग कराव्या लागतील. या सेटींग तुम्ही केल्या तर तुमचे खाते हॅक होण्यापासून वाचू शकते.

तुमचे व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट सुरक्षित ठेवण्यासाठी, टु स्टेप व्हेरिफिकेशन सुरू करा.

स्टेप १ – सर्वात पहिल्यांदा तुम्हाला व्हॉट्सअ‍ॅपवरील सेटिंग्ज मेनूमध्ये जावे लागेल.

स्टेप २ – यानंतर तुम्हाला प्रायव्हसी ऑप्शन निवडावा लागेल.

स्टेप ३ – येथे तुम्हाला टू–स्टेप व्हेरिफिकेशनचा पर्याय दिसेल. यावर क्लिक करुन सहा अंकी पीन सेट करावा लागेल.

जर एखाद्या अनोळखी नंबरवरून व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज आला तर तो मेसेज काळजीपूर्वक उघडा. या मेसेजध्ये अनेकदा संशयास्पद लिंक्स शेअर केल्या जातात. यावर क्लिक करण्यापूर्वी नीट तपासा.

**प्रायव्हसी सेटींग ठेवा**

तुमच्या व्हॉट्सअ‍ॅप खात्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तुमच्या गोपनीयता सेटिंग्ज नेहमी अपडेट ठेवा.

लास्ट सेटिंग अ‍ॅण्ड ऑनलाईन : या सेटींगला माय कॉन्टॅक्ट किंवा नोबडीवर सेट करा.

**प्रोफाईल फोटो :** यामध्ये माय कॉन्टॅक्ट सेट करा, कारण अनोळखी लोकांना तुमचा डीपी दिसणार नाही.

स्टेटस अ‍ॅण्ड अबाऊट : या सेटींगला माय कॉन्टॅक्ट असं करा. जर तुम्हाला अनोळखी नंबरवरुन फोन किंवा मेसेज येत असतील तर ते नंबर ब्लॉक करा.

**ऑटो डाऊनलोड बंद करा**

व्हॉट्सअ‍ॅपवर ऑटोमॅटिक मीडिया फाइल डाउनलोडिंग बंद करा. असे केल्याने तुमच्या व्हॉट्सअ‍ॅप चॅटवर येणारे फोटो, व्हिडिओ व कागदपत्रे थेट डिव्हाइसमध्ये सेव्ह होणार नाहीत.

ऑटो डाऊनलोड बंद करण्यासाठी पहिल्यांदा सेटिंग्ज मेनूवर जा. यानंतर तुम्हाला स्टोरेज आणि डेटा आणि मीडिया ऑटो–डाउनलोडवर जावे लागेल. येथे जा आणि सेटिंग कधीही नाहीवर सेट करा. तसेच तुमचे अकाऊंट कोणत्या डिव्हाईसवर लॉगिन आहे हे चेक करत जा.

# वक्त्या, कवयित्री सरोजिनी नायडू

सरोजिनी नायडू यांचा जन्म १३ फेब्रुवारी १८७९ रोजी हैदराबाद येथे झाला. त्यांच्या आईचे नाव वरद सुंदरी होते. त्या एक कवयित्री होत्या आणि बंगालीमध्ये लिहायच्या. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चट्टोपाध्याय होते, जे प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ होते.

'भारत कोकिळा' म्हणून प्रसिद्ध झालेल्या सरोजिनी यांनी वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी सर्व इंग्रजी कवींच्या रचनांचा अभ्यास केला होता. १८९५मध्ये हैदराबादच्या निजामाने त्यांना शिष्यवृत्तीवर इंग्लंडला पाठवले. सरोजिनी नायडू या हुशार विद्यार्थिनी होत्या. त्यांना इंग्रजी, बंगाली, उर्दू, तेलुगू आणि पर्शियन भाषांचे चांगले ज्ञान होते. सरोजिनी यांचा विवाह १८९८मध्ये डॉ. गोविंद राजालू नायडू यांच्याशी वयाच्या १९व्या वर्षी झाला. त्यांनी घरीच इंग्रजीचा अभ्यास केला आणि वयाच्या १२व्या वर्षी मॅट्रिक पास केले. त्यांना तिचे शिक्षण पूर्ण करता आले नाही, परंतु इंग्रजी भाषेत कविता रचण्यात त्या हुशार होती.

नायडू यांनी गीत कविता या प्रकारात कविता निर्माण केल्या आणि त्यांच्या कविता १९०५, १९१२ आणि १९१७मध्ये प्रकाशित झाल्या. १९०६च्या कोलकाता अधिवेशनात गोखले यांच्या भाषणाने नायडू राजकारणात सक्रिय होण्यात महत्त्वाची भूमिका



## निमित्त

बजावली. भारतीय समाजात पसरलेल्या दुष्कृत्यांसाठी त्यांनी भारतीय महिलांना जागृत केले. भारताच्या स्वातंत्र्यासाठी विविध चळवळींमध्ये सहकार्य केले. जालियनवाला बाग हत्याकांडामुळे संतप्त होऊन त्यांनी १९०८मध्ये मिळालेला 'कैसर–ए–हिंद' सन्मान परत केला.

भारत छोडो आंदोलनात आगा खान राजवाड्यात त्यांना शिक्षा झाली. त्या उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. कुशल राजकारणी असण्यासोबतच त्या चांगल्या लेखिकाही होत्या. १९०३ ते १९१७ या काळात त्या टागोर, गांधी, नेहरू आणि इतर नायकांनाही भेटल्या. १९१४मध्ये त्या लंडनमध्ये महात्मा गांधींना पहिल्यांदा भेटल्या आणि गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाने त्यांना खूप प्रभावित केले.

गोपाळकृष्ण गोखले यांना त्या आपले 'राजकीय पिता' मानत. त्यांच्या विनोदी स्वभावामुळे त्यांना 'जेस्टर इन गांधीजीज मिनी कोर्ट' असे संबोधले जात असे. ॲनी बेझंट आणि अय्यर यांच्यासोबत त्यांनी १९१५ ते १८ या काळात तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना जागृत करण्यासाठी भारताचा दौरा केला. १९१९च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्या गांधीजींच्या विश्वासू सहाय्यक होत्या.

१९१९मध्ये होमरूलच्या मुद्द्यावर त्या इंग्लंडला गेल्या. १९२२मध्ये त्यांनी खादी परिधान करण्याचे व्रत घेतले. १९२२ ते २६पर्यंत त्यांनी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांच्या समर्थनार्थ आंदोलन केले आणि १९२८मध्ये गांधीजींचे प्रतिनिधी म्हणून त्या अमेरिकेला गेल्या.

सरोजिनी नायडू यांनी गांधीजींच्या अनेक सत्याग्रहांमध्ये भाग घेतला आणि छोडो भारत आंदोलनात त्या तुरुंगातही गेल्या. २ मार्च १९४९ रोजी वयाच्या ७०व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. नायडू यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी खूप संघर्ष केला. **(साभार : इंटरनेट)**

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

## झोपण्याआधी लसणाच्या तेलाने करा पायांची मालिश



लसणामध्ये असे अनेक औषधी गुण आढळतात, जे शरीराला वेगवेगळ्या प्रकारचे फायदे देतात. वेगवेगळ्या आयुर्वेदिक उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो. लसणानं पचन तंत्र मजबूत राहतं, कोलेस्टेरॉल कमी होतं, सर्दी–खोकला बरा होतो, शरीर डिटॉक्स होतं. त्याचप्रमाणे लसणाचं तेलही फायदेशीर असतं. लसणाच्या तेलानं जर रात्री तळपायांची मालिश केल्यास अनेक फायदे होतात. खोबऱ्याच्या किंवा मोहरीच्या तेलात लसूण गरम केल्यावर या तेलानं पायांची मालिश केली तर कफ, सूज, श्वास घेण्याची समस्या किंवा फुप्फुसासंबंधी समस्या दूर करण्यास मदत मिळू शकते.

झोपेची समस्या होईल दूर

अनेकांना रात्री झोप न लागण्याची समस्या असते. अशात लसणाच्या तेलानं पायांची मालिस केली तर ही समस्या दूर होण्यास मदत मिळू शकते. या तेलानं मालिश केल्यास मांसपेशींना आराम मिळतो आणि शांत झोप लागते.

फुप्फुसांची समस्या लागेल मार्गी

जर तुमच्या छातीमध्ये कफ जमा झाला असेल आणि फुप्फुसाशी संबंधित समस्यांचा सामना करावा लागत असेल तर रात्री झोपण्याआधी लसणाच्या तेलानं पायांची मालिश करा. यानं श्वासासंबंधी समस्या दूर होईल.

पायांचं दुखणं होईल कमी

जर पाय कोणत्या कारणानं दुखत असेल तर लसणाच्या तेलानं पायांची मालिश करणं फायदेशीर ठरू शकतं. यानं पाायांचं दुखणं दूर होईल आणि मसल्सना आराम मिळेल.

हृदयासाठी फायदेशीर

लसूण खाणं ज्याप्रमाणे हृदयासाठी फायदेशीर असतं. तसंच लसणाचं तेलही हृदयासाठी फायदेशीर ठरतं. लसणाच्या तेलानं पायांची मालिश केल्यास शरीरात ब्लड सर्कुलेशन चांगल्याप्रकारे होतं. ज्यामुळे नसांमध्ये ब्लॉकेज होत नाहीत.

तळपायांवर लसूण घासण्याचे फायदे

हिवाळ्यात पायांवर लसूण घासल्यास उष्णता मिळते आणि तापही कमी होतो. लसणाची कळी ठेवून पायांवर घासली तर ब्लड सर्कुलेशनही चांगलं होतं.

# उधाणाच्या पाण्याने घरांना तडे; भरपाई देण्याची मागणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

खाडी पाण्याच्या उधाणाने बांध तुटून नुकसान झालेल्या धेरंड येथील घरांचे सर्वेक्षण होऊन अद्यापही भरपाई न मिळाल्याने घरमालक भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.

अलिबाग तालुक्यातील शहापूर विभागातील धेरंड गावात १४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री उधाणाच्या पाण्याने खाडीचे बांध तुटले आणि या पाण्याचा प्रवाह गोविंद पाटील तसेच मारुती पाटील, जनार्दन पाटील, मच्छिंद्र पाटील, गणेश पाटील, जालिंदर पाटील, चंद्रकांत पाटील यांच्या घरांचा पाया खचला आणि त्या अनुषंगाने घरांच्या भिंतींना मोठे तडे जाऊन मोठे नुकसान झाले.

या संदर्भात १६ डिसेंबरला शहापूर ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामविकास अधिकारी व तलाठी यांनी सर्वेक्षण केले होते. मात्र अद्यापही या घरांना भरपाई मिळाली नाही. त्यामुळे ग्रामस्थांची चिंता वाढली असून पाठपुरावा केला जात असला तरी ही घरे नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत अडकली आहेत. या संदर्भात न्याय मिळावा, अशी मागणी गोविंद पाटील व इतर ग्रामस्थांकडून होत आहे.



# खालापूरात खंडणीचा गुन्हा दाखल

**खोपोली: प्रतिनिधी**

डोनवत येथील ए.एमएन. एस कंपनी येथील कामगाराला तुझे ग्रॅज्युएटीचे काम मी केले आहे . त्या बदल्यात दहा हजार रुपये न दिल्यास कंपनी बंद करण्याची धमकी दिल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रमोद सुरेश सकपाळरा.वडवळ ता.खालापूर यांचे ए.एम/एन एस कंपनीमध्ये लेबर सप्लायर्सचे कॉन्टॅक्ट असुन त्यांचे लेबरे कॉन्टॅक्ट मधील काम सोडुन गेलेला भगवान ढेबे रा.रानसई ढेबेवाडी ता.खालापूर याने मी कामगार आयुक्त यांचे कार्यालयातुन कंपनी प्रशासनावर दबाव टाकुन तुझे काम करुन दिले आहे

कामाच्या बदल्यात १०हजार रुपये खंडणी मला दिले नाही तर कंपनी बंद करण्याची धमकी दिली याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे णे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई रोहिदास भोर हे करीत आहेत.

# काशीद येथील आदिवासी कुटुंबांना रेशनकार्ड प्रदान



**मुरुड : प्रतिनिधी**

काशीद येथील ३० आदिवासी कुटुंबांना अंतोदय योजने अंतर्गत दारिद्य रेषेखालील रेशन कार्ड प्रदान करण्यात आले.आदिवासी समाज हा गरीब व अशिक्षित असल्याने मुरुड तहसील कार्यालयातून स्वतः मेहनत घेत यांची कागदपत्रे जमा करून त्यांना काही दिवसातच रेशनकार्ड देण्यात आली आहेत.

काशीद ग्रामपंचायतचे तरुण तडफदार सरपंच संतोष राणे यांनी यासाठी विशेष मेहनत घेत सर्व आदिवासी बंधूंना एकत्रित करून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली.रेशनकार्ड मुळे जे फायदे होणार आहेत ते सांगितले.त्या वितरण समारंभास तहसिलदार रोहन शिंदे,पुरवठा अधिकारी निखिल तनपुरे , सरपंच संतोष राणे, ग्राम विकास अधिकारी सुशांत ठाकुर सदस्य दिपेश काते,दिया कासार आदी मान्यवर कार्यक्रमास हजर होते.

यावेळी तहसीलदार रोहन शिंदे यांनी प्राप्त रेशन कार्डचां उपयोग धान्य मिळवण्यासाठी तसेच इतर शासकीय योजनांसाठी घेण्यात यावा. काशीद येथील आदिवासी लोकांना रेशन कार्ड मिळण्यासाठी सरपंच राणे यांनी उत्तम सहकार्य केल्याबद्दल त्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.यावेळी सरपंच राणे यांनी सर्व आदिवासी समाजाने रेशनकार्ड चा उपयोग चांगल्या कामासाठी करावा आपले रेशनकार्ड इतर कोणालाही देऊ नका ते जपून व सुरक्षित वापरण्यास सांगितले.

# खेळातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो –दिनेश म्हात्रे

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद मजगांव मराठी शाळेने पाच दिवसीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आयोजन केले आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मुरुड तालुक्यातील शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी केंद्र प्रमुख दिनेश म्हात्रे आपल्या भाषणात म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर कृतीयुक्त अध्यापनासह खेळ, क्रीडा आदींचे अनुभव देणे आवश्यक आहे. खेळातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. यासाठी आजच्या शालेय विद्यार्थी यांनी मोबाईलमध्ये न गुंतता मैदानी खेळ या कडे जास्त लक्ष केंद्रित करणे खूप आवश्यक आहे.मैदानी खेळामुळे शरीर तंदुरुस्त राहून मन नेहमी प्रफुल्लित राहते. मैदानात जो विद्यार्थी प्रगती करेल तोच राज्यात व देशात नाव उज्वल करणार आहे. यासाठी मैदानी खेळ खूप महत्त्वाचे असल्याचे प्रतिपदान या वेळी त्यांनी केले.

महोत्सवात वैयक्तिक स्पर्धा, सांघिक क्रीडा स्पर्धा, खाद्य महोत्सव, पालकांच्या स्पर्धा व विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम यासारख्या भरगच्च कार्यक्रम झाले.



# श्री वाकडाई देवी मंदिर वर्धापन दिनी पालखी सोहळा

**माणगांव : बातमीदार**

माणगांवचे ग्रामदैवत येथील श्री वाकडाई देवी मंदिर वर्धापन दिना निमित्त भव्य पालखी सोहळा शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी श्री वाकडाई मंदिर ते उतेखोलवाडी हनुमान मंदिर मार्गे पालखी मिरवणूक काढून सपंन्न होणार आहे. समस्त माणगांवकरांनी सहकुटूंब सहपरिवार मित्र मंडळीसह या सोहळ्याचा लाभ घ्यावा, अशी विनंती मंदीर ट्रस्ट व उत्सव कमिटीने केली आहे.



शुक्रवार १४ फेब्रुवारी सकाळी ६:३० वा. श्री वाकडाई देवीला अभिषेक, सकाळी ७ वा. श्री वाकडाई देवीची आरती, सकाळी ठीक ८ वा. श्री वाकडाई देवी पालखी वाजत गाजत जल्लोषात येथील उतेखोल कचेरी रोड – साई मंदिर – उत्तेखोल वाडी हनुमान मंदिर – वाकडाई नगर मार्गे – वाकडाई मंदिराकडे प्रस्थान करणार आहे.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे/जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे वडगांव, ता. खालापूर, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र.हे.आर. चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. दत्तात्रेय बुधाजी जाधव व इतर | १८/१ | ०–९१–५०<br>पो. ख. ०–०७–६०<br>एकुण ०–९९–१० | ७.९४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक / भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **श्री. दत्तात्रेय बुधाजी जाधव व इतर** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- १२/०२/२०२५**

**सही/-**
**अतिश सुनिल परदेशी,**
**अॅड. हायकोर्ट**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**
**मोबा.नं. ९७०२८९८९८९**

# खोपोली येथे संत रोहिदास महाराज जयंती



**चौक : प्रतिनिधी**

श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४८ वी जयंती मोठ्या उत्साहात समाज बांधव यांच्या उपस्थितीत साजरी करण्यात आली .यावेळी समाज बांधवांनी मनोभावे पूजन करून अतिशय आनंदी वातावरणात हा कार्यक्रम यशस्वी केला.

शहरातील जेष्ठ पत्रकार दिनकर भुजबळ, माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर,दिलीप पुरी, कैलास गायकवाड, रवि रोकडे,जिनी सॅम्युअल, विशाल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी महाप्रसादाचे आयोजन संतोषजी कंगले यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मारुती सुर्यवंशी, अनिल नागोटकर, अनिल खालापूरकर, संतोष शेलार, किशोर चव्हाण, निलेश चव्हाण आदींनी मेहनत घेतली.

## जाहीर निविदा

**एकात्मिक बालविकास सेवा योजना पनवेल ग्रामीण अंतर्गत पंचायत समिती सेस मधुन खालील योजना घेण्याचे योजिल आहे**

| | |
|---|---|
| १ | मुलींना व महिलांना व्यावसायिकतांत्रिक प्रशिक्षण अंतर्गत शिवणकाम प्रशिक्षण |
| २ | मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण अंतर्गत ब्युटीपार्लर प्रशिक्षण |
| ३ | अंगणवाडी सेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका यांना प्रशिक्षण देणे रक्कम |
| ४ | मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी जुडो कराटे /योगा प्रशिक्षण रक्कम |
| ५ | किशोरवयीन मुलीना व महिलांना जेंडर आरोग्य कुटुंबनियोजन व कायदेविषयक प्रशिक्षण रक्कम |
| ६ | अंगणवाडयांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत अंगणवाड्यांना कपाटे पुरविणे |
| ७ | अंपग महिलांनासाठी ५ % विविध साहीत्य पुरविणे (घरघंटी पुरविणे डि .बी.टी.) |
| ८ | अंगणवाडयांना विविध साहित्य पुरवणे अंतर्गत अंगणवाडयाची भांडी ठेवण्यासाठी स्टील मांडणी पुरविणे |
| ९ | अंगणवाड्यांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत अंगणवाड्यांना धान्यकोठी पुरविणे. |

तरी यासाठी विविध पुरवठादारा/ प्रशिक्षक संस्थान कडुन दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छुक पुरवठादाराने निविदा सादर करीत असताना खालील कागदपत्रे ही सादर करीत असताना खालील कागदपत्रे ही सादर करावी.

१. Gst प्रमाणपत्र
२ आधारकार्ड
३. पॅन कार्ड

तरी सदरचे प्रशिक्षण देण्यासाठी इच्छुक संस्थानी त्याचे अर्ज व दरपत्रक दि. १३/२/२०२५ ते दि. १९/२/२०२५ या कालावधीत सायंकाळी ५०० वाजेपर्यंत सिलबंद लखोटयात कार्यालयीन वेळेत सार्वजनिक सुटटी वगळून एकात्मिक बालविकास सेवा योजना पनवेल ग्रामीण यांचेकडे सादर करावेत. तसेच अटी व शर्ती साठी कार्यालयाशी संपर्क सादर करावा.

**पत्ता– एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प पनवेल ग्रामीण, पंचायत समिती कार्यालय पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.**

**सही/-**
**प्रविण अधिकराव पाटील**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक बालविकास सेवा योजना,**
**प्रकल्प पनवेल ( ग्रामीण)**

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

MAHATRANSCO

## e- TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost in lakhs |
|---|---|---|
| Tend-63/24-25 RFX 7000035216 | Refurbishing/replacement of EHV underground cable link boxes of 220kV Ulwe- Waghiwali 1 & 2 underground cable line under EHV lines S/Dn. Panvel - II under EHV (O&M) Circle, Panvel. | **Rs. 120.35 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 11.02.2025 to 26.02.2025 up to 11:00 hrs, Opening date:-26.02.2025 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 5000/-+ GST** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार–पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन–४०२१०७**

Email: elraigad.ee@mahapwd.gov.in/elraigad.ee@gmail.com
Website: www.mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र. ०२१४३–२९९२८८

**जा क्र. का.अ./राविवि/निविदा–१/ ४६३/ सन २०२५** **दिनांक: ०६.०२.२०२५**

### ई–निविदा सुचना क्र. २६ सन २०२४–२५

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती–२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८
२. मा. मुख्य अभियंता, सा.बां. विभाग कोकण, मुंबई यांचे पत्र क्र.मु.अ. (को)/विद्युत/४९२८/२०२४ दि.१८.१२.२०२४

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर–पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड–४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३–२९९२८८** हे संदर्भाचे अधिन राहुन महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील नोंदणीकृत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब–१ नमुन्यातील निविदा, ई–निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **मा. अधिक्षक अभियंता (विद्युत), मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां. मुंबई** यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई–निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक / ठेकेदारांचा वर्ग /इसारा रक्कम / कोरा निविदा शुल्क | ई–निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | **द्वितीय मागणी** | | | | |
| १ | **RAESD/OW/216/2024-2025** Providing CCTV System, Internal Electrification, Area Lighting Work, Water Pump, Solar Rooftop System 5KVA, Proposed WORKSHOP building BATU Lonere, Dist -Rigad (Sub Work 1 to 5) | रु. ५२,६६,९१३/- | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ५२७००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक २४.०२.२०२५ सकाळी ११:०० |
| | **प्रथम मागणी** | | | | |
| २ | **RAESD/OW/227/2024-25** Providing Air conditioning unit to various section at Rural Hospital chouk, Tal-Khalapur Dist-Raigad. | रु. ८,७०,०३१/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र. १ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ८८००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ३ | **Est.No.RSD/OW/602/2024-25** Providing Electrical Installation for New Constructions 63Talathi offices at Rajapur Tal & Dist Ratnagiri. | रु. ५०,५२,८०२/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ५०६००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ४ | **Est.No.RSD/OW/603/2024-25** Providing Electrical Installation for New Constructions 65 Talathi offices Building at Tal & Dist Ratnagiri. | रु. ५२,०३,४१५/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ५२१००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ५ | **Est.No.RSD/OW/707/2024-25** Providing Internal Electrification, External Electrification Fire Fighting system, water pumps, Lifts, CCTV system for newly constructed civil courts Judges (Jr Division) residential quarters (14 Nos) at District Court Premises Ratnagiri Tal & Dist Ratnagiri. (sub-Work I to VI) | रु. ९५,३५,३४८/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ९५४००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ६ | **Est.No.RSD/OW/586/2024-25** Providing strengthing to Existing old and unrepairable Electrical Installation, Street Lights, Switchgears, cable, water pump system, Gyser in Premices of Regional Mental Hospital Ratnagiri, Tal-Dist. (Subwork I to V) Ratnagiri. | रु. ८३,६२,०४३/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ८३७००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ७ | **Est.No.RSD/SR/3315/2024-25** Providing Semi comprehensive AMC for Fully Automatic Fire Fighting and Fire System installed at District Civil Hospital Ratnagiri, Subdistrict dapoli, kalambani khed, kamathe chiplun and Rural Hospital Rajapur, Raipatan, Pali, Sangmeshwar, Guhaghar, Mandangad Under District Civil Hospital Ratnagiri in District Ratnagiri (for period 3 year). | रु. ४४,२८,८५२/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ४४३००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ८ | **Est.No.KESD/OW/1240/2024-25** Providing shifting of existing stitchgear panels installed below staircase to open area with cable cable & swgrs at Civil Hospital Sindhudurg Tal. Kudal Sindhudurg. Dist | रु. १६,२६,५४९/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. १६३००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ९ | **Est.No.OW/KESD/1508/2024-25** Providing fire alarm system with fire extinguisher, Fire hydrant and firesprinklers system to Main Building & other bldgs. at Sub District Hospital Kankavali, Tal. Kankavali, Dist. Sindhudurg | रु. ५५,६४,४१८/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ५५७००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| १० | **Est.No.KESD/OW/1354/2024-25** Providing fire alarm system with fire extinguisher, Fire hydrant and firesprinklers system to Main Building & other bldgs. at Sub District Hospital Sawantwadi, Tal. Sawantwadi, Dist. Sindhudurg | रु. ५५,१७,५५०/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ५५२००/–<br>४) निविदा शुल्क रु. १०००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| ११ | **Est.No.RSD/OW/717/2024-25** Providing Addition and Alteration to Existing Air Conditioning System New DPDC Hall at Collector office compound Ratnagiri Tal & Dist- Ratnagiri | रु. २०,५९,५२२/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. २०६००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| १२ | **Est.No.RSD/OW/711/2024-25** Providing Electrical Installation for Newly Construction Self-Employment Shopping Centre and Trainning Centre for Women In Self-Employment Group at Aathawada Bazar Tal.Dist. Ratnagiri. | रु. ९,७४,२९७/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. ९८००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |
| १३ | **Est.No.RSD/OW/712/2024-25** Providing Electrical Installation for Newly Construction self-employment shopping centre and training centre for women in self- employment Group at Pali Tal & Dist Ratnagiri. | रु. १०,२३,००७/– | दिनांक १३.०२.२०२५ सकाळी १०:०० वाजेपासुन दिनांक २८.०२.२०२५ सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत | १) निविदापुर्व बैठक नाही.<br>२) लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील शासकीय संकेतस्थळावर अपलोड केलेल्या निविदा नमुन्यामध्ये सविस्तर दर्शविण्यात आलेला आहे.<br>३) इसारा रक्कम रु. १०३००/–<br>४) निविदा शुल्क रु. ५००/– अधीक GST | दिनांक ३.०३.२०२५ सकाळी ११:०० |

**खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर–पेण, ता.पेण, जि. रायगड, पिन कोड–४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३–२९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.। मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

**सही/**
**(सं.ध. कट्टी)**
**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां. पेण–रायगड**

**आरओसी –२०२४–२५/क्र–५/c ६३३८**

# इलेक्ट्रिक वायर चोरणारी टोळी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील वारदोली येथील वाधवा वाईस सिटी मॅगनोलिया बिल्डींग परिसरात ठेवलेल्या लाखो रुपये किंमतीच्या इलेक्ट्रॉनिक्स वायर व इतर साहित्य चोरी केल्याप्रकरणी अवघ्या २४ तासात पनवेल तालुका पोलिसांनी चौकडीला गुन्ह्यातील गाडीसह ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून चोरीचा माल हस्तगत केला आहे.

गुन्ह्यातील येथील सुपरवायझर याने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करताच वरिष्ठ निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक अनिरुद्ध गिजे, उपनिरीक्षक हर्षल राजपूत, हवालदार देवरे, कुदळे, धुमाळ, तांडेल, बाबर, शिपाई सोनकांबळे, खताळ, भगत आदींच्या पथकाने गुन्ह्यातील आारोपींचा तांत्रिक तपास तसेच मिळालेल्या माहितीच्या आधारे शोध सुरू केला. या वेळी आरोपी मो. राशिद मो. नाझीम फारूकी (वय ३२), मो. साहीद अजगर



आली (वय २१), मो. आसिफ मो. रेहमान (वय २४), मो. इम्रान शफीक अहमद फारुकी (वय ४३), सर्व राहणार धारावी मुंबई यांची माहिती मिळाली. तसेच त्यांच्याकडे असलेल्या गाडी नं. एमएच ४३ एटी ३९१९ जिची किंमत तीन लाख रुपये इतकी आहे व त्या गाडीच्या आधारे त्या ठिकाणी येवून त्यांनी इलेक्ट्रिक वायर व साहित्य पैकी ३,१७,२२० रुपये किमतीचा व मोबाईल फोन २०,००० रुपये किमंतीचे असा एकूण ६,३७,२२० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला होता.

या चौकडीला ताब्यात घेताच त्यांनी गुन्ह्यातील मुद्देमाल व वापरलेली गाडी पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. सदर चौकडीने यापूर्वीसुद्धा अशा प्रकारचे काही गुन्हे केलेले आहेत का, याचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

## रसायनी कॉर्नर ते कष्टकरीनगर रस्ता दुरुस्तीसाठी निवेदन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील रसायनी कॉर्नर ते कष्टकरीनगर रस्ताची दुरावस्था झाली असून रस्त्यांची चाळण झाल्याने अपघातांना आमंत्रण मिळत आहे.

रस्त्यांतील खड्डयांमुळे वाहनचालक मेटाकुटीस आला आहे. या रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे झालेल्या दोन मोठ्या अपघातात दोघांना आपला जीव गमवावा लागला आहे.या रस्त्यांवरील खड्डे चुकविता ना वाहनचालकांनाहि मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे, अनेक वाहनांचे नुकसान या खराब झालेल्या रस्त्यामुळे होत आहे. रसायनी कॉर्नर ते कष्टकरीनगर रस्त्याचे कॉक्रीटीकरण करावे, अशी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी केली आहे.

या रस्त्यावर अपघात होवून जीवितहानी झाल्यास त्याला पूर्णपणे प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग जबाबदार राहील, असे सुभाष कोकणे यांनी बोलताना सांगितले.



## कुटुंबिनी महिला संघातर्फे हळदीकुंकू



**उरण : वार्ताहर**

उरणमधील कुटुंबिनी महिला संघाच्या वतीने हळदीकुंकू समारंभ महाराष्ट्र भुषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी शाळेत शनिवारी मोठ्या उत्साहात झाला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या लावणी सम्राज्ञी मेघा घाटगे, निता महेश बालदी, भावना घाणेकर, माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, शैलजा घरत, पटेल ज्वेलर्सच्या जनरल मॅनेजर प्रतिक्षा डायस आदी उपस्थित होते.

पाहुण्यांच्या स्वागता नंतर कुटुंबिनी महिला संघ उरण च्या संस्थापिका आरती ढोले व अध्यक्षा श्लोक पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुटुंबिनी महिला संघ उरण च्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाच महिलांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रिती पाटील (स्केटिंग प्रशिक्षक), मानसी सिग़ (मेकअप आर्टिस्ट), रणिता ठाकूर (पत्रकार), कल्पना सुर्वे (सामाजिक कार्य), पल्लवी शिंदे (इंटरनॅशनल मेकअप आर्टिस्ट) म्हणून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये ज्युनिअर सलमान खान (जोहेब सय्यद) ची एन्ट्रींने खूप रंगत आणली तसेच लावणी सम्राज्ञी मेघा घाडगे यांनी आपल्या दिलखेचक अदांनी लावणीच्या नृत्याने घायाळ केले. पटेल ज्वेलर्स कडून महिलांना एक सौभाग्य अलंकार वाण म्हणून देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी व सुनियोजित होण्यासाठी कुटुंबिनी महिला संघाच्या संस्थापिका आरती ढोले, अध्यक्ष श्लोक पाटील, कार्याध्यक्षा दिपिका माळी, उपाध्यक्षा नयना धोत्रे, सचिव वृषाली पवार, सहसचिव प्रियांका घरत, शुभांगी शिंदे, खजिनदार निशा म्हात्रे, सह खजिनदार गायत्री माळी, प्रिया मयेकर, दर्शना गावंड, कल्पना सुर्वे, सल्लागार रिद्धी पाटील, संगीता साळुंखे, सविता डेरे, सदस्या रश्मी गावंड, सुप्रिया राक्षीकर, प्रशाली सावंत, मानसी सिंग, ऋतुजा बंसल, साची साहतीया आदींनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले. तर निशा म्हात्रे यांनी आभार मानले.

# कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवा

## नवी मुंबई महापालिका आयुक्तांचे मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

११ फेब्रुवारीपासून १२ वीची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा सुरु झाली असून १८ मार्चपर्यंत चालणाऱ्या या परीक्षा तसेच १० वीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पाडण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने संपूर्ण तयारी केली असून त्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीव्दारे झालेल्या विशेष बैठकीत परीक्षा काळात कोणताही गैरप्रकार घडणार नाही याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी मौलिक सूचना करीत निर्देश दिले. या दूरदृश्य प्रणालीव्दारे झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही मार्गदर्शन केले.

या बैठकीच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महापालिका शिक्षण विभागास १२ वीच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. याकरिता नियंत्रण अधिकारी म्हणून शिक्षण विभागाच्या उपयुक्तांची नियुक्ती केली



असून त्यांच्यासह शिक्षणाधिकारी व केंद्र समन्वयक अधिकारी यांनी विविध परीक्षा केंद्रांना भेटी देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी करण्याचे निर्देशित केले आहे. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत ३ भरारी पथके व २ बैठया पथकांची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये १५अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व परीक्षा केंद्रांवर पिण्याचे स्वच्छ व शुध्द पाणी, स्वच्छतागृह व्यवस्था, पंखे, लाईट आदी भौतिक सुविधा असण्याबाबत खातरजमा करुन घ्यावी व त्या उपलब्ध असण्याबाबत दक्षता घ्यावी असे आयुक्तांनी सूचित केले.

नवी मुंबई पालिका क्षेत्रात असलेल्या ३० ठिकाणच्या परीक्षा केंद्रांमध्ये १६ हजार ४९६ विद्यार्थी हे १२ वीची परीक्षा देत आहेत. यापैकी नवी मुंबई महानगरपालिकेच्या दोन शाळांमध्ये परीक्षा केंद्रे असून त्याठिकाणी ३६१ विद्यार्थी १२ वीची परीक्षा देत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकही केंद्र संवेदनशील म्हणून जाहीर नाही. तरीही सर्व परीक्षा केंद्रांवर आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना करतानाच केंद्रांच्या ठिकाणी असलेले सीसीटीव्ही कार्यान्वित असल्याची खात्री करुन घ्यावी व त्याचे छायाचित्रीकरण रेकॉर्डींग जतन राहील याची दक्षता घ्यावी असे आयुक्तांनी निर्देशित केले. परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात परीक्षेशी संबंधित नसलेले कोणीही उपस्थित नसेल याबाबतही खबरदारी घेण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

**तर परीक्षा केंद्राची मान्यता रद्द होणार**

ज्या परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार आढळून येतील त्या केंद्राची मान्यता कायमची रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येणार असून यामध्ये दोषी आढळणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आढावा बैठकीत स्पष्ट करण्यात आले आहे. या बाबीची संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी असे सूचित करण्यात आले आहे. १२ वीच्या परीक्षांप्रमाणेच १० वीच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा कालावधीतही 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

**एनएमएमटी बसेस धावणार वेळेवर**

परीक्षा कालावधीत नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या एनएमएमटी बसेस वेळेवर धावतील याची काळजी घेण्याचे निर्देश परिवहन व्यवस्थापकांना देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे रेल्वे प्रशासनासही गाडया वेळेवर उपलब्ध असतील याची दक्षता घेण्याचे पत्राव्दारे सूचित करण्यात येत आहे.

**तर उपायुक्तांशी संपर्क साधा**

विदयार्थ्यांनी परीक्षेच्या वेळेच्या १ तास आधी आपापल्या परीक्षा केंद्रांवर हॉल तिकीटासह उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी. सोबत शक्य झाल्यास ओळखपत्रही ठेवावे. परीक्षा कॉपीमुक्त पारदर्शक रितीने पार पडतील याची काळजी घेऊन परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे असे आवाहन आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे..या कालावधीत कुठेही गैरप्रकार आढळल्यास अथवा तक्रार करावयाची असल्यास शिक्षण विभागाच्या उपायुक्तांशी ०२२-२७५६७०६७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.




**उरण : येथील ज्येष्ठ व्यापारी आणि आनंद भुवन (साठे हॉटेल)चे मालक चंद्रकांत साठे यांनी वयाची ८० वर्षे पूर्ण केली. त्या निमित्त साठे परिवाराने त्यांचा सहस्रचंद्र दर्शन सोहळा रविवारी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार महेश बालदी यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.**

## दिवाळे कोळीवाड्यात रंगणार 'बॅन्जो बिट्स' स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

आगरी-कोळी समाज प्रगत झाला असला, तरीही नव्या पिढीला ताल वाद्याचा विसर पडू नये या अनुषंगाने आगरी कोळी संस्कृतीचा वारसा जपत, नाविन्याची कास धरून पारंपरिक संगीतमय ठेवा या शीर्षकाखाली रेन्बो फ्रेंड सर्कल युवा सामाजिक संस्था यांच्या वतीने भव्य स्वरूपात 'बॅन्जो बिट्स' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार (दि.२३) दिवाळे कोळीवाड्यात ही स्पर्धा रंगणार असून, या स्पर्धेसाठी मुंबई, ठाणे, रायगडसह नवी मुंबई परिसरातील अनेक प्रसिद्ध बॅन्जो पथकांनी आपला सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेमध्ये लोक संगीतातील भावगीत, भक्तीगीत, लोकगीत आणि कोळीगीत



अशी विविध गाणी सादर होणार असून, रसिक प्रेक्षकांना हीं गाण्यांची सुरेल मैफिल प्रत्येक्षात अनुभवता येणार आहे. यासाठी निवडक १२ बॅन्जो पथक आपले सादरीकरण करणार असून, या स्पर्धेदरम्यान पंचक्रोशीतील प्रसिद्ध बॅन्जो मास्तर; तसेच संगीतकार व संगीत कलेचा वारसा जपणाऱ्या गीतकारांचा सन्मान करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी संगीत क्षेत्रातील नामवंत परीक्षक लाभणार आहेत.

दरम्यान, नवी मुंबईत प्रथमच अशी अनोखी भव्य बँन्जो स्पर्धा होतं असल्याने संगीत कलाप्रेमींमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. या स्पर्धे साठी प्रथम विजेत्या बँन्जो कला पथकाला रुपये पंधरा हजार व चषक तर, उपविजेत्या पथकाला रुपये दहा हजार आणि भव्य चषक देण्यात येणार आहेत. तसेच, परीक्षकांनी निवडलेल्या सर्वोत्कृष्ठ थापढोल वादक, सर्वोत्कृष्ठ रोटो वादक व सर्वोत्कृष्ठ कॅषो वादक यांना आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या वेळी, जास्तीत जास्त बॅन्जो पथकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन रेन्बो फ्रेंड सर्कलच्या वतीने करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये ब्राह्मण ज्ञातीबांधवांचा स्नेहमेळावा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसर ते नवी मुंबई या विभागातील ब्राह्मण ज्ञातीबांधवांचा स्नेहमेळावा झाला. सलग तिसऱ्या वर्षी हा मेळावा 'भारतीय विद्या भवन', वाशी येथे झाला. या कार्यक्रमाचे प्रायोजकत्व चित्पावन फाउंडेशन व सहप्रायोजकत्व 'कुळकर्णीज श्रीखंड पार्लर' यानी स्वीकारले. कायदेतज्ञ स्मिता कर्वे, परशुराम आर्थिक महाविकास मंडळाचे अध्यक्ष आशिष दामले, यशस्वी उद्योजक रामभाऊ भोगले, प्रमोद लेले या मान्यवरांसह ज्ञातीबांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

चंद्रकान्त ताह्मनकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. नंतर कायदेतज्ञ स्मिता कर्वे यांनी 'लॉ, मोरॅलिटी आणि इथिक्स' यांच्यातील फरक सोप्या शब्दात



समजून सांगितला. आशिष दामले यांनी 'समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी वसतिगृह शासनाच्या माध्यमातून शिक्षण व नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करेन तसेच बिझनेस लोन, बचत गट, विदेशी शिक्षण व कर्ज योजना या गोष्टींचा लाभ मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध राहीन' असे सांगितले. ज्येष्ठ उद्योजक रामभाऊ भोगले यांनी 'आपला धर्म आपले कर्तव्य आहे. आपली पूजा पद्धती आपली संस्कृती आहे. तरुण पिढीने तेजस्वी ओजस्वी समाज निर्माण करावा आणि उद्योग व्यवसाय करावा' असे मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रमोद लेले यांनी 'समाजातील तरुणांनी वैयक्तिक व सामाजिक पातळीवर कसं कार्यरत राहायला हवं' यासाठी मार्गदर्शन केले.

त्यानंतर सर्व बांधवांनी १०० टक्के मतदान करण्याची शपथ घेतली. सांस्कृतिक कार्यक्रमात मंदार भिडे, मनाली कुलकर्णी व अनया जोशी यांचे गायन व प्रतिक साठे यांच्या मिमिक्रीचा कार्यक्रम संपन्न झाला. ओंकार काळे यानी गायकाना तबलासाथ केली. जान्हवी खराळकर आणि पल्लवी देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : महादेव कोळी समाजातर्फे श्री मल्हारी मार्तंड देवाचा उत्सवनिमित्त कोळीवाडा ते संगमेश्वर (मुळे) येथे श्रीखंडोबा देवाची पालखी काढण्यात आली होती.** (छाया : जितू शिगवण)

## संत रविदास महाराज जयंती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

समाजवादी विचारसरणी मांडणारे संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी कोंकण भवनातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

रैदास या नावाने प्रसिद्ध. उत्तर भारतातील एक मध्ययुगीन संत. महाराष्ट्रात रोहिदास म्हणून ओळखले जाणारे संत हेच असावेत, असे दिसते. ते काशीचे राहणारे होते. त्यांच्या वडिलांचे नाव राहू, आईचे नाव करमा व पत्नीचे नाव लोना होते. त्यांना विजयदास नावाचा पुत्र असल्याचा उल्लेख परमानंदस्वामिरचित रविदास पुराण ह्या ग्रंथात आढळतो.

सत्संगतीचा परिणाम होऊन ते बाराव्या वर्षापासूनच राम व सीता यांच्या मूर्तीची पूजा करू लागले. रविदास यांची पदे ग्रंथसाहिबमध्ये आढळतात. त्यांच्या रचनाचा एकसंग्रह प्रयागहून रैदासजी की बानीया प्रकाशित झाला आहे. संत रविदास हे संत कबीर यांचे समकालीन असल्याचा उल्लेख आढळतो. मीराबाईनी आपल्या अनेक पदांतून रविदास हे आपले गुरु असल्याचे म्हटले आहे.

## नव्या बीएनएसएस कायद्याचे पोलिसांकडून मार्गदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जुन्या आयपीसी कायदयातल्या बदलांची माहिती नवी मुंबईतील पत्रकारांना देऊन मीडियाच्या माध्यमातून झालेल्या बदलांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला.

एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक अजय शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पत्रकारांना मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. ब्रिटिशकालीन आयपीसी कायदा कलमांचे बीएनएसएस अर्थात भारतीय न्याय संहिता हा नवा बदल



लागू झाला आहे. यावर कार्यवाही सुरु झाली असून अनेक आधुनिकत पद्धतीने केले जाणारे गुन्हे कमी होणार असून गुन्हेगार ज्रेबंद होण्यासाठी मदत होणार असल्याचे अजय शिंदे यांनी सांगितले. या वेळी ॲड. स्नेहल, पोनि. (गुन्हे) महेश मांडवे, अंकुश कर्चे, डोमाळे आदी उपस्थित होते.

# जंजिरा किल्ला येथील जेट्टीचे काम सुरू

**मुरुड : प्रतिनिधी**

प्रसिद्ध जंजिरा किल्ला पहाण्यासाठी वर्षाला सात लाख पर्यटक येत असतात. या किल्ल्याच्या प्रवेश द्वाराजवळ असणारी जेट्टी येथून बोटीमधून पर्यटक किल्ल्यात उतरत असत, परंतु या जेट्टी वरून उतरताना भरतीच्या वेळी उतरताना पर्यटकांना खूप त्रास सहन करावा लागत होता.



भरतीच्या वेळी बोट हेलकावे घेत असल्याने बोटी मधून उतरणे खूप मुश्किल होत असे. बोटीच्या हेलकावे घेतल्यामुळे नाशिक येथील महिला पर्यटक यांना पाय सुधा मोडला होता. अशा वारंवार घडलेल्या घटनेमुळे राज्य शासनाकडून या प्रकरणाची दखल घेण्यात येऊन अखेर महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या माध्यमातून किल्याच्या पाठीमागील बाजूस नवीन जेट्टी बांधण्याचे ठरवण्यात आले. नेहमीप्रमाणे मेरी टाईम बोर्डाने ठेकेदारास काम दिले व कामास सुरुवात झाली. सुरुवातीला जोरदार काम सुरू झाले व पावसाळा जवळ असल्याने हे काम बंद पडले. वास्तविक पाहता पावसाळा संपल्यावर ऑक्टोबरमध्ये हे काम सुरू होणे अपेक्षित होते, परंतु सध्या हे काम नुकतेच सुरू झाल्याने पर्यटक यांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. कामाला दिरंगाई होत असल्याने हे काम कधी पूर्ण होणार या बाबत विविध शंका निर्माण केल्या जात आहेत. जेट्टी पूर्ण झाल्यावर शिडाच्या बोटी स्थिर राहतील का? या बाबत बोट धारक सुधा चिंता व्यक्त करीत आहेत.

ही जेट्टी बांधण्यासाठी केंद्र व राज्य सरकार मिळून ९३ कोटी ५६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पैसे मंजूर असूनदेखील काम मात्र खुप धिम्या गतीने सुरू आहे. ऑक्टोबर ते जानेवारी म्हणजे चार तब्बल चार महिने काम बंद राहिले ते फेब्रुवारी महिन्यात काम सुरू झाले आहे. आता उर्वरित तीन महिने हातात असून या जेट्टी चे काम कुठ पर्यंत जाते हे पहावयास मिळणार आहे. जेट्टीला आवश्यक लागणारे सिमेंट, दगडे, स्टील व आवश्यक साहित्य किल्ला पाण्याच्या मध्यभागी असल्याने बोटी च्या साह्याने सामानाची ने आण केली जाते. त्यामुळे खर्चात सुधा वाढ होत आहे. सध्या जेट्टीचा एवढाच ढाचा बनला असून पुढील तीन महिन्यात या कामाची प्रगती कशी असणार आहे. हे लवकरच दिसून येणार आहे.

जेट्टीच्या कामाने किल्ल्याच्या भूमिस अजून स्पर्श केलेला नाही. या जेट्टी समुद्रावर आधारित दिसत आहे. जेट्टी वर ट्रे ट्रे पोर्ट अंथरण्यात आले आहेत. नुकतेच सुरू झालेले काम येत्या तीन महिन्यांत कोठे जाते हे कामाच्या प्रगती वरून दिसणार आहे.

# उत्पन्नाचे दाखले देण्याचे काम सुरू करण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

सध्या कर्जत तालुक्यातील तलाठी कार्यालयात विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कामासाठी त्यांच्या पालकांना दिले जाणारे उत्पन्नाचे दाखले देणे बंद झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून तलाठी कार्यालयाने पंचनामा करून देण्याची कार्यवाही पुन्हा सुरु करावी. या मागणीचे निवेदन आरपीआय आठवले पक्षाचे वतीने कर्जत तहसीलदार यांना देण्यात आले.



कर्जत तालुक्यामध्ये उत्पन्नाचा दाखल्या देण्यासाठी आवश्यक असलेले पंचनामे तलाठी कार्यालय किंवा तहसील कार्यालय कडून केले जात नाहीत. त्यामुळे पालकांनी केलेल्या तक्रारीनंतर आरपीआय आठवले पक्षाचे वतीने कर्जत तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. तालुक्यामध्ये शासकीय कामासाठी व शालेय विद्यार्थ्यांना उत्पन्न दाखल्याची आवश्यकता लागत आहे, परंतु काही कारणास्तव शासनाकडून तलाठी कार्यालय यांना उत्पन्नाच्या दाखल्यासाठी लागणारा जबाब पंचनामा करणे बंद करण्यात आलेले आहे.

कार्यालयातील आपल्या येथील सेतू कार्यालयामध्येदेखील आपण उत्पन्नाच्या दाखल्यासाठी परवानगी दिलेली नाही.

तहसीलदार डॉ. धनजंय जाधव यांना आरपीआय आठवले पक्षाचे कोकण प्रदेश कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर, कर्जत तालुका युवक माजी सचिव राहुल गायकवाड, कर्जत तालुका युवक माजी अध्यक्ष अमर जाधव, कर्जत तालुका माजी सचिव मनोज गायकवाड, कर्जत शहर युवक माजी अध्यक्ष स्वप्निल काकडे, माजी युवक सचिव किशोर जाधव, राजू जगताप, सिद्धांथ गायकवाड आदींना निवेदन दिले.

# रोहा येथे विद्यार्थ्यांसाठी सुदर्शन क्रिया

**रोहे : प्रतिनिधी**

आर्ट ऑफ लिविंग इंटरनॅशनल तर्फे रोहा येथे ८ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी उत्कर्ष योगा व मेधा योगा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दोन टप्यात झालेल्या या उपक्रमात रोह्यातील सहा वेगवेगळ्या शाळेतील १०००हुन अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.



या विद्यार्थ्यांनी घेतला सुदर्शन क्रियेचा अनुभव पहिल्या टप्यात दिनांक २०–२२ जानेवारी रोजी डॉ. सी. डी. देशमुख माध्यमिक विद्यालय, कै. प्रफुल्लशेठ बारटके शाळा मंगलवाडी, रोहा न. प. शाळा क्र. १, ९ व १० येथील ५०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. शाळेतर्फे विद्या धनवी, कुसाळकर, गायकवाड, लांगे आणि दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी व्यवस्थापन केले.

दुसऱ्या टप्यात ४ ते ६ फेब्रुवारी रोजी एम बी पाटील इंग्लिश स्कूल वरसे आणि एम बी मोरे फाऊंडेशन इंग्लिश मिडीयम स्कूल धाटाव येथील ५०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. शाळे तर्फे देसाई, देशपांडे, भाऊसाहेब माने व अनघा माने, सावंत व रोहन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी व्यवस्थापन केले.

आर्ट ऑफ लिविंग इंटरनॅशनलचे वरिष्ठ समन्वयक देव गोसाकीजी व गोरख डांगे हे उत्कर्ष योगा व मेधा योगासाठी रोहा येथे आले. रोहा येथील आर्ट ऑफ लिविंगच्या प्रशिक्षिका सुषमा तलवार, मंजुषा जोशी, अनंत थोरात, करुणा व समिधा अष्टीवकर यांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले.

अभ्यासात एकाग्रता, सुसूत्रता आणण्यासाठी योगाभ्यास, प्राणायाम व जगविख्यात सुदर्शन क्रिया विद्यार्थ्यांना त्यांच्या वयोगटा प्रमाणे शिकविण्यात आल्या. यापुढील टप्यात अजुन १००० विद्यार्थ्यांना उत्कर्ष योग व मेधा योगाचे योगाभ्यास, प्राणायाम व सुदर्शन क्रियेचे प्रशिक्षण देण्याचा ऑफ लिविंग इंटरनॅशनलचा संकल्प आहे.

# खोपोलीमध्ये टाकाऊपासून टिकाऊ वस्तू प्रदर्शन

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज लता गोकुळ पाटील, उप मुख्याधिकारी रणजीत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शाहू महाराज माध्यमिक विद्यालय खोपोली या ठिकाणी टाकाऊपासून टिकाऊ वस्तू प्रदर्शन आयोजित करण्यात आले.



या स्पर्धेमध्ये खोपोली नगर परिषदेच्या प्राथमिक एकूण १५ शाळा व माध्यमिक विभागाच्या सहा शाळा तसेच खाजगी विद्यालयामध्ये खोपोली हिंदी विद्यालय, जनता प्राथमिक विद्यालय, सह्याद्री माध्यमिक विद्यालय, पी. पी गगनगिरी माध्यमिक विद्यालय, लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय, उर्दू माध्यमिक विद्यालय, ताकई माध्यमिक विद्यालय या सर्व शाळांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता खोपोली शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी जयश्री धायगुडे मॅडम नगर परिषद शिक्षण विभागामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे लियाकत पठाण सर, श्वेता कुराडे IEC, खोपोली नगर परिषद हिंदी माध्यमिक विद्यालयाचे हर्ष साहेबराव धावारे, गौतम मोरे, सह्याद्री माध्यमिक विद्यालयाचे भीमराव बाबुराव बैसाणे, जनता विद्यालयाचे हेमंत नारायण देसाई, आनंद कोळी, श्रीराम पवार, राजेंद्र म्हात्रे, मोहन पाटील, भरत सोलंकी भक्ती साठिलकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली व कार्यक्रम यशस्वी केला.

प्रदर्शनामध्ये टाकाऊपासून टिकाऊ अनेक वस्तू विद्यार्थ्यांच्या मार्फत बनविण्यात आल्या. टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ वस्तू कशा प्रकारे बनते हे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात या ठिकाणी दाखवण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांनी केलेले कार्य खरोखर अलौकिक असल्याने खोपोली नगर परिषदेनेदेखील या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

# माघ पोर्णिमेनिमित्त कोळी बांधवांचा मल्हारी मार्तंड पालखी सोहळा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा–महेंद्र खैरे–माघ पोर्णिमेचे निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे कोळी बांधवाचा मल्हारी मार्तंड पालखी सोहळा रेवदंडा व थेरोंडा येथे मोठया उत्साहात झाला. मल्हारी मार्तंड देवाची पालखी संपुर्ण रात्रभर वाजतगाजत, भंडाराची उधळण करण्यात आली. मोठया संख्येने कोळी बांधव या मल्हारी मार्तंड पालखी सोहळयास सहभागी झाला होता.

कोळी बांधवाचे मल्हारी मार्तंड हे कुलदैवत आहे, दर्यावर्दी कोळीबांधव मच्छीमारीसाठी समुद्रांत जाताना मल्हारी मार्तंड व सौसे माता यांचे स्मरण करतात. प्रतिवर्षी माघ पोर्णिमेच्या निमित्ताने थेरोंडा खंडेरावपाडा येथील मल्हारी मार्तंड मंदिरात पाच गाव ग्रामस्थांचे वतीने तिन दिवस उत्सव साजरा केला जातो. माघ पोर्णिमा ११ फेब्रुवारी रोजी सायकांळी ६ वाजून ४५ मिनिटांनी सुरूवात होते. त्यावेळी थेरोंडा मल्हारी मार्तंड मंदिरातून ठिक सात वाजता पालखी सोहळयास प्रारंभ होतो, वाजत गाजत ढोलताश्याच्या तालावर, भंडाराची उधळण करत प्रस्थान करते.

सायकांळी सात ते साडेअकरा या दरम्यान थेरोंडा मल्हारी मार्तंड मंदिर ते रेवदंडा मोठा कोळीवाडा गुंड यांचे घरापर्यंत पालखीचा मान थेरोंडा आगलेची वाडी ग्रामस्थांचा असतो. त्यानंतर रात्री साडेअकरा ते रात्री तिन वाजेपर्यंत रेवदंडा मोठा कोळीवाडा ते बाजारपाडा दरम्यान पालखीचा मान थेरोंडा बाजारपाडा ग्रामस्थांचा असतो, रात्री ३ ते सकाळी ९ पर्यंत थेरोंडा बाजारपाडा ते डोर्याची वाडी दरम्यानचा पालखीचा मान थेरोंडा खंडेराव पाडा ग्रामस्थांचा असतो, सकाळी अकरा ते दुपारी तिन दरम्यान पालखीचा मान डोर्याची वाडी ग्रामस्थांचा असतो. यावर्षी पाच गाव पाटील उमेश कोंडे यांचे नेतृत्वाखाली पाच गाव थेरोंडा ग्रामस्थांचे वतीने या पालखी सोहळयाचे आयोजन करण्यात येते.

तसेच रेवदंडा कोळीवाडी येथील मल्हारी मार्तंड मंदिरातून माघ पोर्णिमेला परंपरांगत पालखी सोहळाचे आयोजन करण्यात येते. यापुर्वी पाटील कुंटूबियाकडे असलेली पालखी सोहळा विधीला सन १९७१ साली रेवदंडा खंडोबा देवालय विश्वस्त कमिटी मार्फत आयोजन करते, या पालखी सोहळयास रेवदंडा मोठा कोळीवाडा, मधला कोळीवाडा व पागार कोळीवाडा यांच्या सहभाग असतो. रेवदंडा मोठा कोळीवाडा मल्हारी मार्तंड खंडोबा मंदिरातून निघालेली पालखी रेवदंडा भैरवी मंदिर हायस्कुल शाळा येथून फिरते ते रेवदंडा पागार कोळीवाडा व मधला कोळीवाडा येथून पुनस्य मंदिरात पोहचते.

रेवदंडा येथील महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली या पालखी सोहळयाचे आयोजन केले जाते. थेरोंडा पाच गाव पालखी सोहळा मिरवणूक सुमारे १८ ते १९ तास अखंड सुरू असते तर रेवदंडा कोळीवाडा पालखी सोहळा १४ तास अखंड सुरू असतो. या निमित्त कोळी बांधव मोठ्या संख्येने सहभागी होवून माघ पोर्णिमेची संपुर्ण रात्र पालखी मिरवणूक मोठया उत्साहात करते. रेवदंडा व थेरोंडा या दोन्ही पालखी सोहळा मिरवणूक रेवदंडा पारनाका येथे रात्री बारा ते एक या दरम्यान एकत्रीत येतात. या वेळी रेवदंडा पंचक्रोशीतून मोठया संख्येने पालखी सोहळा पहाण्याची गर्दी होते.

# खोपोलीमध्ये बचत गटाचे उपजीविका केंद्र सुरू

## आमदार महेंद्र थोरवेंच्या हस्ते उद्घाटन

**खोपोली : प्रतिनिधी**

दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापित बचत गटांची उत्पादने विक्री करणे तसेच महिलांच्या कलागुणांना वाव देवून त्यांची नोंदणी करून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, या साठी डॉ. पंकज पाटील मुख्याधिकारी तथा प्रशासक खोपोली नगर परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली व विभाग प्रमुख श्वेता बाराथे यांच्या मार्गदर्शनाखाली शहर उपजीविका केंद्राचे बांधकाम करण्यात आले आहे. या शहर उपजीविका केंद्राचे उदघाटन कर्जत खालापूरचे लोकप्रिय आमदार महेंद्र थोरवे साहेब यांच्या हस्ते आज रोजी उदघाटन करण्यात आले.



शहरातील महिलांनी उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध झालीच पाहिजे या साठी येणाऱ्या अधिवेशनात या बाबत आमदार साहेब मुद्दा उपस्थित करून त्यांना काम मिळवून देण्याचे विधेयक मांडणार असल्याचे सांगितले तसेच शासनातर्फे जेवढ्या योजना येतात त्या सर्वांचा लाभ महिलांना मिवून द्यावा या बाबत अंमलबजावणी करावी व शहरातील महिलांना याच इमारतीत विविध प्रशिक्षण आयोजित करून त्यांना कसे सक्षम करता येईल यावर भर द्यावा, असे महिलांना आव्हान केले.

खोपोली नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी रणजीत पवार, एनयुएलएम विभाग प्रमुख श्वेता बाराथे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी एनयुएलएमचे शहर अभियान व्यवस्थापक पंकज खोत व समुदाय संघटक सविता जाधव, समुदाय संसाधन व्यक्ती (CRP) तसेच शहरातील शहर स्तर संघ, वस्ती स्तर संघ प्रतिनिधी व सर्व बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रस्तावना शहर वस्ती स्तर संघाच्या अध्यक्षा जयश्री मिंडे यांनी केले तर सूत्रसंचालन शशीकांत सुर्वे यांनी केले.

# पतसंस्थेचा चढता आलेख हीच ग्राहकाची विश्वासाहर्ता –विशाल बाफना

**पेण : प्रतिनिधी**

श्री भगवान महावीर सहकारी नागरी पतसंस्था गेल्या दोन वर्षांच्या प्रवासात बऱ्याच अग्निदिव्यातून जाताना नवनवीन अनुभव आणि आपल्या सारखे हितचिंतक मिळाले. यामळेच आत्मविश्वास शतपटीने वाढलाय आणि व्यावसायिक दिशा लाभली यामुळे पतसंस्थेचा आलेख चढता असून हीच ग्राहकाची विश्वासाहर्ता आल्याचे प्रतिपादन पतसंस्थेचे अध्यक्ष विशाल बाफना यांनी केले.

श्री भगवान महावीर सहकारी नागरी पतसंस्थेच्या वतीने पतसंस्थेचा वार्षिक प्रगती महोत्सव व हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शेकडो खातेदार महिलांनी आपली उपस्थिती दर्शविली. या वेळी महेंद्रकुमार बाफना, लीना बाफना, जियान बाफना, व्यवस्थापक प्रकाश मनोरे, सराफ असोसिएशन अध्यक्ष कन्हैया पुनमिया, हेमेंद्र जैन, रणजीत जैन आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

ग्राहकांच्या आवडीनिवडीनुसार व्यवस्था निर्माण करून आम्ही प्रामाणिकपणे नातेसंबंध जपले आहेत. त्यामुळेच पतसंस्थेच्या या पारिवारिक स्नेहसंम्मेलनात आपणा सर्वांना एकत्र पाहून खरंच खूप आनंदी होतोय. ही आपली सुरुवात आहे असे विशाल बाफना म्हणाले.

भगवान महावीर सहकारी नागरी पतसंस्थेतर्फे मुदत ठेव योजना, दैनिक ठेव योजना, विशेष लखपती योजना, महिलांकरीता आवर्ती ठेव व विशेष योजना आदी योजन सुरू असुन ऑनलाईन सेवा, दैनिक उत्पन्न कार्यक्रम, महिला सशक्तिकरण कार्यक्रम, कर्मचारी वैद्यकीय विमा ही पतसंस्थेची उद्दिष्ट असल्याचे लीना बाफना यांनी बोलताना सांगितले.

या वेळी लकी ड्रॉ काढण्यात आला. त्यातील तीन विजेत्यांना सोन्याची अंगठी, सोन्याचे एयरींग व सोन्याची नथ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच या पतसंस्थेतील कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या सोहोळ्यात अक्षय पाटील यांनी खेळ पैठणीचा हा कार्यक्रम सादर करून उपस्थित महिलावर्ग व मान्यवरांची मने जिंकली.



# बारावीची परीक्षा तणावमूक्त होण्यासाठी विद्यार्थ्यांचे स्वागत



**खोपोली : प्रतिनिधी**

राज्यात बारावीची परीक्षा सुरूवात झाली आहे. पहिला पेपर असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह असला तरी विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेची भिती आणि तणाव दूर व्हावा यासाठी जनता विद्यालय परीक्षा केंद्रावर खालापूर तालुका शिक्षण प्रसार मंडाळाचे अध्यक्ष आणि संचालकांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून विशेष स्वागत केले आहे. परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत पाहून पालकांनी संस्थाचालकांचे आभार व्यक्त केले आहे.

राज्य मंडळातर्फे घेण्यात येणारी बारावीची परीक्षा मंगळवार दि.११ फेब्रुवारी पासून सुरू झाली आहे. रायगड जिल्ह्यातील बारवी बोर्डाची परिक्षेचा केंद्र म्हणून खालापूर तालुका शिक्षण मंडाळाच्या जनता विद्यालयाचे मोठे नाव आहे. याठिकाणी जनता विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय, गगनगिरी इंटरनॅशन ज्यू.कॉलेज, वसंत देशमुख मेमोरियल ज्यू.कॉलेज आणि आनंद शाळा येथील जवळपास एक हजार ४२२ विद्यार्थी परिक्षा देत असून तर के.एम. सी.महाविद्यालयात २०७, धीरूभाई अंबानी स्कूल ३१५,जनता विद्यालय मोहपाडा ३३० असे तालुक्यातील चार परिक्षा केंद्रावर दोन हजार २७४ विद्यार्थी परिक्षा देत आहेत.

परीक्षा सुरक्षित वातावरणात होण्यासाठी संस्थेने योग्य खबरदारी घेतली असून विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेची भिती आणि तणाव दूर व्हावा यासाठी जनता विद्यालय परीक्षा केंद्रावर खालापूर तालुका शिक्षण प्रसार मंडाळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष अबूबकर जळगांवकर, संचालक, कैलास गायकवाड, जितेंद्र रावळ, पंचायत समिती वरीष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास यांनी विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून विशेष स्वागत केले.

# शुबमन गिलने मोडला वर्ल्ड रेकॉर्ड!

## वनडेमध्ये ‘ही’ कामगिरी करणारा जगातील पहिला फलंदाज

**अहमदाबाद : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा वनडेमधील नवा उपकर्णधार शुबमन गिलने इंग्लंडविरूद्ध वनडे मालिकेत वादळी फलंदाजी केली आहे. तिन्ही सामन्यांमध्ये त्याने ५० अधिक धावांचा टप्पा गाठला आहे. तर तिसऱ्या वनडे सामन्यात गिलने जबरदस्त शतक झळकावले आहे. यादरम्यान शुबमन गिलने एक मोठा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.

शुबमन गिलने अहमदाबादमधील तिसऱ्या वनडे सामन्यात १३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ९७ चेंडूत १०४ धावा करत आपले शानदार वनडे शतक पूर्ण केले आहे. तर भारतीय संघाचा वनडेमधील उपकर्णधार ही जबाबदारी मिळाल्यानंतर गिलचे हे पहिलं शतक आहे.

शुबमन गिलने २०२४ मध्ये भारताकडून वनडेमध्ये सर्वाधिक धावा केल्या होत्या. तोच फॉर्म कायम ठेवत गिलने या वर्षात सुरूवात केली आहे. गिलने वनडेमध्ये ५० डावांमध्ये सर्वात जलद २५०० धावांचा टप्पा गाठला



आहे. ही कामगिरी करणारा गिल जगातील पहिला फलंदाज ठरला आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेचा महान फलंदाज हाशिम अमलाचा विक्रम मोडला, ज्याने ५० एकदिवसीय डावात २४८६ धावा केल्या होत्या, तर गिलने त्याच्या ५० व्या एकदिवसीय डावात २५०० धावांचा टप्पा ओलांडला आहे.

शुभमन गिलने केवळ एका डावात विश्वविक्रम मोडला आहे. त्याने ५० एकदिवसीय डावात २५०० धावा पूर्ण केल्या आहेत. हाशिम अमलाने ५१ डावांमध्ये २५०० वनडे धावा पूर्ण केल्या होत्या. इमाम उल हकने ५२, व्हिव्ह रिचर्ड्सने ५६ आणि जोनाथन ट्रॉटनेही ५६ डावांत २५०० धावा पूर्ण केल्या.

शुभमन गिलने वनडेमध्ये ताबडतोड फलंदाजी केली आहे. गिलने ५० एकदिवसीय डावांत ६० पेक्षा जास्त सरासरीने २५०० हून अधिक धावा केल्या आहेत. गिलने एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतकही ठोकले आहे, त्याची सर्वोत्तम धावसंख्या २०८ धावा आहे. या खेळाडूने एकदिवसीय क्रिकेटमध्ये एकूण सहा शतकं आणि १५ अर्धशतकं केली आहेत. त्याचा स्ट्राइक रेटही १०० पेक्षा जास्त आहे.

### शुबमन गिलची हॅटट्रिक

शुबमन गिलने इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत हॅटट्रिक पूर्ण केली. गिलने या मालिकेतील तिन्ही सामन्यांमध्ये पन्नास अधिक धावा केल्या आहेत. गिलने नागपूर वनडेत ८७ धावांची खेळी केली होती. कटकमध्ये त्याने ६० धावा केल्या आणि त्याने तिसऱ्या वनडे सामन्यात शतक झळकावले असून तो नाबाद आहे.

### वनडे इतिहासात सर्वात जलद २५०० धावा करणारे खेळाडू

**५० डाव : शुभमन गिल**
**५१ डाव : हाशिम आमला**
**५२ डाव : इमाम उल हक**
**५६ डाव: व्हिव्हियन रिचर्ड्स**
**५६ डाव : जोनाथन ट्रॉट**

### कारकिर्दीतील पहिल्या ५० एकदिवसीय डावात सर्वाधिक धावा करणारे फलंदाज

**२५०३* – शुभमन गिल**
**२३८६ – इमाम–उल–हक**
**२२६२ – फखर जमान**
**२२४७ – शाई होप**

# जिंदल विद्या मंदिर शाळेत क्रीडा महोत्सव

## अवनी सदनाचा विक्रमी विजय!




**मुरूड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर शाळेत नुकतेच दोन दिवशीय वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात झाला. या भव्य सोहळ्याचे उद्घाटन जेइटीचे प्रमुख श्रीनिवास कोटीपल्ली यांच्या हस्ते झाले. त्यांच्यासोबत जिंदल विद्या मंदिर, वासिंदचे प्राचार्य प्रशांत शर्मा उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना खेळाचे जीवनातील महत्त्व पटवून दिले. खेळ केवळ स्पर्धा नाही, तर तो आयुष्य जगण्याची कला आहे. तो आपल्याला चिकाटी, शिस्त, संघभावना आणि कठोर परिश्रम करण्याची प्रेरणा देतो, असे मत श्री श्रीनिवास कोटीपल्ली यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी केले, तर उप प्राचार्य मंगेश बमनोटे यांचे विशेष सहकार्य लाभले. मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत सांगितले की, खेळ आपल्याला अपयश स्वीकारण्याची आणि यश मिळवण्यासाठी पुन्हा उभे राहण्याची ताकद देतो. शिक्षणासोबतच क्रीडाक्षेत्रातही विद्यार्थी घवघवीत यश मिळवू शकतात.

स्पर्धेमध्ये तिसरी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विविध क्रीडा प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यामध्ये अवनी सदनाने सर्वाधिक विजय संपादन करत क्रीडा महोत्सवाचा बहुमान पटकावला!

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक व शाळेतील इतर शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभले. क्रीडामहोत्सवाने विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती आणि स्पर्धात्मक भावना जागृत केली. खेळ, उत्साह आणि मैत्रीचा जल्लोष – जिंदल विद्या मंदिरचा वार्षिक क्रीडा महोत्सव अविस्मरणीय ठरला आहे. या शाळेतील असंख्य विद्यार्थी यांनी विविध खेळात सहभागी होऊन विविध पारितोषिके पटकावली आहेत.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत खालापूरचे खेळाडू चमकले




**खोपोली : प्रतिनिधी**

क्रीडा संकुल डोंबिवली येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत डॉ. देव इंटरनॅशनल मार्शल आर्टस् अकादमीच्या चार खेळाडूंनी तीन सुवर्ण, दोन रौप्य, तीन कास्यपदके जिंकली. ९फेब्रुवारी रोजी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. खालापूरातील

माही बैलमारे हिने दोन कास्यपदके, दित्या पाटील एक सुवर्ण, एक रौप्यपदक, श्रेया तिवारी एक सुवर्ण एक रौप्यपदक, सई देशमुख एक सुवर्ण एक कास्यपदक पटकावले.

यशस्वी स्पर्धेकांना सेन्सिई नितीन बोंदार्डे, मिलिंद जोगावडे, धीरज पंडित ह्यांचे मार्गदर्शन मिळाले. संस्थेचे मुख्य प्रशिक्षक डॉ. महादेव शिंदे, सर्व खेळाडू, प्रशिक्षक ह्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# जिम्नॅस्टिक्समध्ये महाराष्ट्राला दोन सुवर्ण, एक रौप्य

**डेहराडून : प्रतिनिधी**

जिम्नॅस्टिक्समध्ये किमया कार्ले आणि परिणा मदनपोत्रा या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत १६व्या दिवशी सकाळच्या सत्रात दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकून धडाकेबाज सुरुवात केली.

भागीरथी संकुलात सुरू असलेल्या रिदमिक्स स्पर्धेतील बॉल प्रकारात ठाण्याच्या किमया कार्ले हिने बाहुलीच्या कॅरेक्टरचे अफलातून सादरीकरण केले. जिवंत बाहुलीच्या रूपात बॉलवर वैविध्यपूर्ण प्रात्यक्षिके सादर करून पंचासह उपस्थित क्रीडाप्रेमींची वाहवाह मिळवीत किमयाने सर्वाधिक २५.९५ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकावर मोहर



उमटवली. मुस्काना राणा (२५.७५ गुण) व मान्या शर्मा (२५.९५ गुण) या जम्मू – काश्मीरच्या खेळाडूंनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदकाची कमाई केली.

रिदमिक्सच्या हुप प्रकारात ठाण्याच्या परिणा मदनपोत्रा हिने तोबा तोबा.. आणि लैला मैं लैला.. या बॉलिवूड गाण्यावर मंत्रमुग्ध करणाऱ्या अतिशय कलात्मक व अफलातून रचना सादर करून २४.४५ गुणांची कमाई करीत सुवर्ण पदकावर महाराष्ट्राचे नाव कोरले. याच प्रकारात महाराष्ट्राच्या किमयाने क्रुवेला या कॅरेक्टरवर एटीट्यूड आणि खुन्नस या थीमवर सुरेख रचना सादर करून २४.१५ गुणांसह रुपेरी यश मिळविले. हरियाणाची लाइफ अदलखा २४.०५ गुणांसह कांस्य पदकाची मानकरी ठरली. किमया कार्ले ही मानसी गावंडे व पूजा सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते, तर परिणा मदनपोत्रा हिला वर्षा उपाध्ये यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# महावितरणची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

**कल्याण : प्रतिनिधी**

बारामती येथे झालेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय आंतरपरिमंडलीय क्रीडा स्पर्धेत कल्याण–रत्नागिरी परिमंडल आणि सांघिक कार्यालय–भांडुप परिमंडल या दोन्ही संयुक्त संघांनी चमकदार कामगिरी केली. या स्पर्धेत कल्याण–रत्नागिरी परिमंडलाच्या संयुक्त संघाने ६ सुवर्ण आणि ११ रौप्य तर सांघिक कार्यालय–भांडुप परिमंडलाच्या संयुक्त संघाने ६ सुवर्ण आणि ९ रौप्य पदकांची कमाई केली.

कल्याण–रत्नागिरी परिमंडलाच्या संयुक्त संघाने सांघिक क्रीडा प्रकारात कबड्डी (पुरूष), क्रिकेट (पुरुष) आणि टेबल टेनिसमध्ये (महिला) रौप्यपदकाची कमाई केली. वैयक्तिक क्रीडा प्रकारात मेघा जुनघरे, सुनिल कोकणी, रंजना तिवारी, सुनिल सावंत व अपुर्व शिर्के यांनी सुवर्णपदके पटकावली. तर १०० मीटर धावण्यात मेघा जुनघरे, ४०० मीटर धावण्यात संपदा कोटरे, चंद्रशेखर हेमणे, लांब उडीत अमित हुमणे, भाला फेकमध्ये हर्षला मोरे व मिलींद डफळे, टेबल टेनिस एकेरीत रंजना तिवारी, टेनिक्वाईटमध्ये लीना पाटील यांनी रौप्यपदके पटकावली.

सांघिक कार्यालय–भांडुप परिमंडलाच्या संयुक्त संघाने सांघिक क्रीडा प्रकारात कबड्डी (पुरूष), खो–खो (महिला) स्पर्धेत सुवर्णपदक तर कबड्डी (महिला), कॅरम (महिला), ४ बाय १०० मीटर रिले (महिला), कॅरम (पुरूष), टेबल टेनिस (महिला) स्पर्धेत रौप्य पदकांची कमाई केली. वैयक्तिक क्रीडा प्रकारात साईनाथ मसणे, सागर सुर्यवंशी, सोनाली मोरे, अनंत नागरगोजे यांनी सुवर्णपदकांची कमाई केली. तर अमृता जोशी, साईनाथ मसणे, संदेश मोहिते, राणी पानसरे यांनी रौप्यपदक पटकावले. सर्व पदकविजेत्या खेळाडुंचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# विराट कोहलीने मोडला सचिन तेंडुलकरचा महाविक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

विराट कोहलीने इंग्लंडविरूद्ध तिसऱ्या वनडेमध्ये अर्धशतक झळकावत आपला फॉर्म परत मिळवला आहे. विराट कोहलीने ५५ चेंडूत ७ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५२ धावांची शानदार खेळी केली. विराट कोहली चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी पुन्हा आपल्या जुन्या अंदाजात परतला आहे, ही टीम इंडियासाठी चांगली गोष्ट आहे. विराट कोहलीने या अर्धशतकी खेळीमध्ये दोन विक्रम आपल्या नावे केले आहेत.

विराट कोहलीने या शतकी खेळीदरम्यान क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरचा मोठा विक्रम मोडला आहे. इंग्लंडविरूद्ध वनडेमध्ये त्याने ही कामगिरी आपल्या नावे केली. याशिवाय सर्वात कमी डावात १६ हजार किंवा त्याहून अधिक धावा



करणारा तो आशियातील फलंदाज ठरला आहे.

रोहित शर्मा दुसऱ्याच षटकात १ धाव करून बाद झाल्यानंतर विराट कोहली आणि शुबमन गिलने भारताचा डाव सावरला. विराट कोहलीने शुबमन गिलच्या साथीने आघाडी घेत १० षटकांत संघाची धावसंख्या ५० धावांच्या पुढे नेली. ११व्या षटकापर्यंत गिल आणि कोहली यांच्यात ५० धावांची भागीदारी झाली. यानंतर दोघांनी वेगवान धावा करत भारताला १३ षटकांत ७९ धावांपर्यंत नेले. यादरम्यान कोहलीने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला.

तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात १६ धावांचा टप्पा गाठून विराट कोहलीने इंग्लिश संघाविरुद्ध आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४००० धावा पूर्ण केल्या. इंग्लंडविरुद्ध ४००० धावा करणारा तो पहिला भारतीय ठरला. यादरम्यान विराटने सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला. यापूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक धावा करणारा भारतीय खेळाडू सचिन तेंडुलकर होता. सचिनने इंग्लंडविरुद्ध ३९९० धावा केल्या होत्या. आता विराट कोहली पुढे गेला आहे.

# रचिन रवींद्रबद्दल पाकचा माजी खेळाडू बरळला

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

लाहोरच्या गद्दाफी स्टेडियमवर पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यादरम्यान न्यूझीलंडचा रचिन रवींद्र गंभीर जखमी झाला. कॅच पकडण्याच्या प्रयत्नात चेंडू त्याच्या चेहऱ्यावर आदळला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. रक्तबंबाळ झालेल्या रचिन रवींद्रला मैदानाबाहेर नेण्यात आले. यामुळे पाकिस्तानच्या आयोजनावर टीका करण्यात आली. अशातच पाकिस्तानच्या माजी कर्णधाराने केलेल्या एका विधानामुळे वाद निर्माण झाला आहे.



पाकिस्तानी माध्यमांशी बोलताना सलमान बट म्हणाला, जर लोकांना समजून घ्यायचे नसेल तर त्यांना समजावून सांगण्याचा काही उपयोग नाही. लाहोर स्टेडियममध्ये नवीन एलईडी दिवे आहेत आणि उच्च प्रतीचे आहेत. जेव्हा न्यूझीलंडचे खेळाडू १५० किमी वेगाने चेंडू फेकतात आणि त्यावर न्यूझीलंडचे खेळाडू चौकार–षटकार मारतात त्या वेळी दिव्यांचा विषय येत नाही. जेव्हा तुम्ही फलंदाजी किंवा गोलंदाजी करता तेव्हा वेगवान चेंडू दिसतो. तुम्ही समजून घेतले पाहिजे की, ७० मीटर अंतरावर उभा असलेला खेळाडू झेल घेऊ शकला नाही, कदाचित त्याला दुखापत झाली असेल.

रचिन रवींद्रची दुखापत इतकी गंभीर होती की त्याला चेंडू लागल्यानंतर त्याने लगेच मैदान सोडले. हा चेंडूत डोळ्याला लागू शकला असता. चेंडू रचिनच्या डोक्यावर लागताच रक्तस्त्राव सुरू झाला होता आणि त्याला टाके घालावे लागले. एवढेच नाही तर तो दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा दुसरा एकदिवसीय सामनाही खेळू शकला नाही. असे असूनही पाकिस्तानी माजी खेळाडूंकडून बेजबाबदार विधाने केली जात आहेत.

# रियान परागने सर्च हिस्ट्रीबद्दल सोडले मौन

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा युवा खेळाडू रियान पराग हा आयपीएलदरम्यान खूप चर्चेत असतो,पण त्याशिवाय गेल्या वर्षी तो एका वेगळ्या कारणासाठीही चर्चेत आला होता. या खेळाडूची यूट्युब हिस्ट्री व्हायरल झाली होती, ज्यामध्ये त्याने बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान आणि अनन्या पांडे यांची नावे सर्च केली होती आणि त्यावरून त्याला ट्रोल करण्यात आले. आता रियानने या वादावर आपले मौन सोडले आहे.

आयपीएल २०२४नंतर रियान परागच्या गेमिंग सेशनचे लाईव्ह स्ट्रीमिंग सोशल मीडियावर खूप व्हायरल झाले. रियान लाईव्ह स्ट्रीमिंग करताना कॉपी–फ्री संगीत शोधत होता, पण या काळात तो त्याची स्क्रीन लपवायला विसरला. त्याच्या सर्च लिस्टमध्ये सारा अली खान हॉट आणि अनन्या पांडे हॉट असे शब्द



लिहिलेले दिसले. त्यानंतर त्याला खूप ट्रोल करण्यात आले आणि त्याची खिल्ली उडवण्यात आली. आता या वादावर रियानने सिटी १०१६ रेडिओ स्टेशनशी बोलताना स्पष्टीकरण दिले.

रियान पराग म्हणाला, मी आयपीएलचा एक सामना संपवला आणि चेन्नईमध्ये आलो. सामना संपल्यानंतर मी माझ्या स्ट्रीमिंग टीमसोबत डिस्कॉर्ड कॉल केला आणि तो व्हायरल झाला. खरेतर ही गोष्ट आयपीएलच्या आधीच झाली होती, पण ते नंतर व्हायरल केले गेले. माझ्या डिस्कॉर्ड टीममधील एका माणसाने मला अडकवण्याचा प्रयत्न केला होता. त्याला लगेचच नोकरीवरून काढून टाकण्यात आले, पण आयपीएलनंतर मी पुन्हा स्ट्रीमिंग सुरु केले. तेव्हा माझ्याकडे स्पॉटीफाय किंवा ॲपल म्युझिक नव्हते. सर्व काही अनइन्स्टॉल केलेले होते. म्हणून मी गाणी ऐकण्यासाठी युट्युबवर गेलो आणि गाणी शोधली, पण मला कळत नव्हते नेमके काय चालू आहे आणि माझं स्ट्रीमिंग संपताच मला कळले की, हे असे काहीतरी व्हायरल झालंय. मी त्या वेळी याबाबत काहीही स्पष्टीकरण देत बसलो नाही. मला ते फार महत्त्वाचे वाटले नाही

दरम्यान, रियान पराग त्यानंतर टीम इंडियातूनही खेळला. तेथे त्याने चांगली कामगिरी केली. आता तो आयपीएल २०२५मध्येही खेळताना दिसणार आहे.

# कामोठ्यात रंगणार स्वराज्य चषकाच्या लढती

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

शिव सह्याद्री चॅरिटेबल ट्रस्ट सेक्टर ३४ कामोठे यांचे तर्फे एसजीएस सर्वे प्रायव्हेट लिमिटेड आणि स्वादिष्ट वेज रेस्टॉरंट यांच्या सहकार्याने रविवारी (दि.१६) ४० वषावरील खेळाडूंसाठी स्वराज्य चषक अंडर आर्म क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.

विजेत्या संघाला रुपये पाच हजार एक तर उपविजेत्या संघाला ३००० रुपये रोख पारितोषिक आहे. तर प्रोत्साहन पर दोन हजार एक रुपयाचे पारितोषिक तिसऱ्या क्रमांकाच्या संघाला मिळणार आहे त्याचप्रमाणे उत्कृष्ट गोलंदाज पृष्ठफलंदाज सामनावीर यांना आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

प्रत्येक सामना चार षटकांचा आणि सॉफ्ट टेनिस बॉलने खेळवण्यात येणार आहे. सहभागाविषयी आणि अधिक माहितीसाठी ९१६७०४८४५४,८६८९८८११२७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com